श्री मंगेश

श्री शांतादुर्गा



-अ.वा.मराठे

साहित्य रस माला प्रका

नियमित वाचा साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-

न' साप्ता वाचा साहित्य-रस स्पर्धा

'साहित्य- हिक नियमित वाचा साहित्य

देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित वाचा सा

प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमि

प्रकाशन संस्था प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप

रस माला प्रकाशन संस्था दलाल 'साहि

डवा साहित्य-रस माला प्र काशक: देवेन्द्र

र्धा नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रकाशन संस्था प्रक

साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रका

मित वाचा साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-रस

साप्ताहिक साहित्य-रस स्पर्धा निय

हित्य-स्व नियमित वाचा साहित्य-रस

द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित वाचा साहित्य-

काशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित

गोमंतकांतील श्रीशिव--पार्वती

श्रीमंगेश-शांतादुर्गा

[या सुप्रसिद्ध देवस्थानांची पौराणिक व ऐतिहासिक माहिती, गोत्र-प्रवरांची-विशेषतः वत्स-कौंडिन्य व कौशिक गोत्रीयांची माहिती, श्रीस्थळांतील मुख्य व परिवार देवता, उत्सव, व तदनुषंगिक इतर माहितीसह]

: संपादक :

अनंत वासुदेव मराठे

('पूजामार्गप्रदीप,' 'तुकारामगाथा,' 'शारदीय नवरात्र,' 'ग्रहनक्षत्रपीडा-परिहार' 'श्रीसांईबाबा चरित्र' इत्यादि पुस्तकांचे कर्ते)

मूल्य १॥ रुपया

साहित्य-रस माला
प्रकाशन संस्था
प्रकाशक
देवेन्द्र दलाल

मुद्रक :
ब्रह्मानंद नाडकर्णी
संजय प्रेस, ९२५ तुळशी पाईप रोड,
दादर, मुंबई २८

प्रथमावृत्ति
८–५–१९६४

प्राप्ति स्थळ :
साहित्य–रस माला,
बुक सेलर्स आणि पब्लिशर्स,
२१९, भीमराव वाडीच्या समोर,
ठाकुरद्वार रोड, मुंबई—२.

प्रकाशक :
देवेंद्र दलाल
साहित्य–रस माला
नीतिन मॅन्शन
७ वी खेतवाडी, लेन,
मुंबई–४.

गोमंतकांतील

श्रीमंगेश–शांतादुर्गा

विषयानुक्रम

प्रास्ताविक दोन शब्द

महाराष्ट्रांतील दशविध ब्राह्मणांत पंचगौड व पंचद्रविड असे दोन भेद असून गौडांत सारस्वत ह्या नांवाचा एक मोठा पोटभेद आहे. हे ब्राह्मण महाराष्ट्रांत केव्हां, कोठून आले यासंबंधानें निश्चित पुरावा उपलब्ध नसला तरी नांवावरुन गौड हे 'गुड' देशांतून, सारस्वत हे 'सरस्वती' नदीच्या तीरावरून व द्रविड हे दक्षिणेकडच्या 'द्रविड' देशांतून वर सरकून महाराष्ट्रांत आले असें म्हणतां येईल.

ह्यांपैकीं सारस्वत ब्राह्मणांची वस्ती गोमांतकांत अनेक वर्षें होती व आहे. चारशें वर्षांपूर्वी तिथें पोर्तुगीज लोकांचा अंमल असून त्यांनीं हिंदूंचें ख्रिस्तीकरण करण्यासाठीं अमानुष अत्याचार केले तेव्हां त्यांचा मुख्य कटाक्ष या ब्राह्मण वर्गावरच असल्यामुळें त्यांचीं कित्येक कुटुंबें आपापले गांव सोडून उत्तरेकडच्या त्या वेळच्या आदिलशहाचे देसाई-प्रभुदेसाई यांच्या राज्यांत व दक्षिणेकडच्या कारवार वगैरे प्रांतांत निघून गेलीं. तथापि त्यांचीं कुलदेवतास्थानें गोमंतकांतच राहिलीं. त्यांनाही आपल्या मूळ स्थानांतून स्थलांतर करावें लागलें, पण तीं फारशीं दूर न जातां नजीकच्या त्यावेळच्या नाईक-प्रतापराव सरदेसायांच्या मुलखांत नेऊन ठेवण्यांत आलीं.

ह्या ब्राह्मणांचीं अनेक कुटुंबें आज गोमंतकाबाहेर सुखानें नांदत आहेत. मुंबईत तर त्यांच्या कांहीं वसाहतीच आहेत. तथापि त्या सर्वांना एकत्र आणणाऱ्या त्यांच्या कुलदेवतांचा आणि गोमंतक ही आपली मातृभूमि किंवा पितृभूमि आहे या गोष्टीचा त्यांना कधींच विसर पडलेला नाहीं. दरवर्षी नियमितपणे गोमंतकांत येऊन कुलदेवतेचें दर्शन घेणारे अनेक लोक आहेत. कुलदेवतेच्या पुजाऱ्यांकडून दरवर्षी नियमित 'प्रसाद' मागविणारे थोडेथोडके नाहींत आणि कित्येकांनीं तर आपल्या किंवा आपल्या आप्तेष्टांच्या नांवानें श्रीस्थळीं दरसाल लघुरुद्र, एकादशिनी, सप्तशतीचा पाठ इत्यादि धार्मिक कृत्यें नियमित चालावीं म्हणून कायमच्या देणग्याहि देऊन ठेवल्या आहेत. अशा रीतीनें ह्या ब्राह्मणांचा गोमंतकांत अतिनिकटचा संबंध आजहि कायम आहे.

गोमंतकांतील ह्या देवस्थानांत श्री मंगेश व श्रीशांतादुर्गा हीं देवस्थानें फार समृद्ध आहेत. त्यांची व्यवस्थाही नमुनेदार आहे; पण त्यांची माहिती बाहेरच्या जगाला फारच थोडी असेल. वर सांगितल्याप्रमाणें खुद्द सारस्वत

ब्राह्मणांची आपल्या कुलदैवतांवर श्रद्धा असली तरी त्यांची वास्तविक माहिती असणारे सध्याच्या पिढींत तरी थोडेच सांपडतील.

या सर्वांना ही माहिती थोडक्यांत करून देणारें पुस्तक प्रसिद्ध करावें अशी अनेक दिवस मनीषा होती. त्याप्रमाणें संस्कृत 'सह्याद्रि खंड' प्राकृत 'मांगिरीश महात्म्या'दि पुस्तकें, त्याचप्रमाणें 'ज्ञानकोशा'दि संदर्भग्रंथ व प्रस्तुत देवस्थानाविषयींचीं श्री.वागळे, शेळडेकर, शर्मा इत्यादींचीं जुनीं पुस्तकें, व वृत्तपत्रें, मासिक पुस्तकें इत्यादींमधून प्रसिद्ध झालेले कांहीं लेख यांचा उपयोग करून व स्वतः त्या देवस्थानीं जाऊन अवश्य ती माहिती घेऊन हस्तलिखित तयार केलें होतें. आमचे संशोधक मित्र श्री. वासुदेव वामन वाघ आणि श्रींचे एक परम भक्त श्री. विनायक नारायण धुमे यांनीं समग्र हस्तलिखित वाचून कांहीं उपयुक्त सूचनाही केल्या होत्या. श्री देवस्थानच्या व्यवस्थापक मंडळानेंही आम्हांला वेळोवेळीं मार्गदर्शन केलें होतें.

अशा रीतीनें या पुस्तकाची प्राथमिक तयारी झाली होती. तथापि संकल्प आणि सिद्धि यांच्यामध्यें कित्येक वेळां दैवाचा किंवा कालपुरुषाचा अडसर असतो, तो दूर झाल्याशिवाय संकल्प पुरा होत नाहीं, हा अनेकांचा अनुभव आम्हांलाही येत होता. आणि मुंबईच्या 'साहित्यरसमाले'चे चालक श्री. दलाल यांनीं आपल्या नेहमींच्या सौजन्यानें व औदार्यानें ह्या पुस्तकाच्या प्रसिद्धीचें काम अंगावर घेतलें नसतें तर आणखी किती दिवस हस्तलिखित पडून राहिलें असतें तें सांगतां येत नाहीं. तेव्हां वर नमूद केलेल्या सहाय्यकांबरोबरच श्री. दलाल यांचेही आम्हीं अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

सैपाक तयार झाला तरी पाटपाणी करून तो यथायोग्य रीतीनें पुढें मांडण्याचें काम कमी महत्त्वाचें नसतें. हें काम करतांना आम्हांला मुंबईचे रंगसम्राट श्री. रघुवीर मुळगांवकर यांची केवढी मदत झाली ती शब्दांनीं सांगणें अशक्य आहे. त्यांनीं अत्यंत आपुलकीनें या दोन्ही देवस्थानांचें सुयोग्य दर्शन घडविणारें एक भव्य चित्र करून तें आमच्या स्वाधीन केलें. प्रस्तुत पुस्तकाचें मुखपृष्ठ हें त्या चित्राचीच छोटी प्रतिकृति आहे.

मुंबईच्या 'रेक्स स्टुडिओ'चे चालक श्री. राजाध्यक्ष व 'रेगे प्रोसेस स्टुडिओ'चे श्री. रेगे यांचेही या कामीं बहुमोल साह्य झालें आहे.

मुंबईच्या संजय छापखान्याचे श्री. नाडकर्णी व छापखान्यांतील कामगार वर्ग यांनीं अडचणींवर मात करून छपाई पार पाडली याबद्दल त्यांचेही आभार मानणें आमचें कर्तव्यच आहे.

तात्पर्य, सदर पुस्तक हें या सर्वांच्याच सहानुभूतीच्या व मदतीच्या बळावर आज जनतेसमोर येत आहे. तेव्हां त्यांचे पुन: एकदां सामुदायिक रीत्या आभार मानून तें आम्हीं जनतेच्या हातीं देतों आणि जनता त्याचें उदार अंत:करणानें स्वागत करील अशी आशा बाळगतों.

मुंबई, दि. ८।५।६४ —संपादक

मडगांवच्या मराठी साहित्यसंमेलनाच्या वेळींच पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरल्यामुळें छपाई घाईघाईनें उरकावी लागली, त्यामुळें अनवधानानें कांहीं चुका राहण्याचा संभव आहे. वाचकांनीं त्या अवश्य आमच्या नजरेस आणाव्या अशी विनंती आहे. म्हणजे पुनरावृत्तीच्या वेळीं त्या दुरुस्त करण्यांत येतील.

साहित्य-रसमालेचें अपूर्व धाडस

सर्वांगसुंदर

तुकाराम-गाथा

: संपादक :

अनंत वासुदेव मराठे

[सर्व सांप्रदायिकांना मान्य, विषयवार वर्गीकरण, महत्त्वाचे पाठभेद, मोठा टाइप, बहुरंगी आठ चित्रें, अभंगांची वर्णानुक्रमवार सूचि, कठिण शब्दांचा कोश इ० इ०]

पृष्ठें ११६४

आणि

किंमत अवघी ८ रुपये

: प्राप्तिस्थळ :

साहित्य-रसमाला प्रकाशन

२१९ ठाकुरद्वार, मुंबई २

॥ श्रीर्विजयते ॥

उपोद्घात

भरतखंडाची आध्यात्मिक परंपरा फार थोर असून मूर्तिपूजा हा त्या परंपरेंतील एक दुवा आहे. ही मूर्तिपूजा केव्हां प्रचारांत आली याबद्दल विद्वान लोकांत तीव्र मतभेद आहेत. पण भरतखंडांतील मूर्तिपूजा आणि जगांतल्या इतर देशांत या ना त्या प्रकारांत चालू असलेली मूर्तिपूजा यांत महत्त्वाचा फरक आहे तो असा, कीं भारतीय लोक– त्यांना आर्य म्हणा कीं हिंदु म्हणा– मूर्ति हें सर्वशक्तिमान, सर्वसाक्षी परमेश्वराचें प्रतीक मानतात आणि पूजा करतात ती ज्या दगडाची, धातूची अगर मातीची ती मूर्ति असेल त्या दगडाची, धातूची अगर मातीची करीत नसून त्या मूर्तीच्या अथवा प्रतीकाच्या अंतरंगांतील देवांशाची करतात. कोणत्याही देवतेचें आवाहन करणें, विसर्जन करणें इत्यादि कल्पनांत हेंच तत्त्व दिसून येतें.

सर्वशक्तिमान, सर्वसाक्षी व सर्वांतर्यामीं वसत असलेल्या त्या परमेश्वराचीं ब्रह्मा-विष्णु–महेश हीं अनुक्रमें सत्त्व–रज–तमोगुणयुक्त तीन अंगें मानलेलीं असून या अफाट विश्वांतील यच्चयावत् स्थावर-जंगमात्मक सृष्टीच्या उत्पत्ति–स्थिति –लय या अवस्थांच्या कारकदेवताही त्याच मानलेल्या आहेत. श्रीशिव–सदाशिव–रुद्र इत्यादि हीं महेशाचीं दुसरीं नांवें असून पिंडींत बसविलेलें लिंग हें त्याचें प्रतीक असतें आणि स्थल- काल–व्यक्तिसंबंधांवरून त्या त्या लिंगाला महाबळेश्वर, त्र्यंबकेश्वर, रामेश्वर, व्याडेश्वर इत्यादि अनेक नांवें पडलेलीं आहेत.

श्री शिवाच्या पत्नीचें नांव पार्वती असें असून ती पर्वतकन्या मानलेली आहे व तिच्या सौम्य व उग्र स्वरूपानुसार तिलाही निरनिराळीं नांवें प्राप्त झालेलीं आहेत. ही पार्वती बहुधा मूर्तिस्वरुपांतच ठिकठिकाणीं आढळून येते. देशावरील कोल्हापूर, तुळजापूर इत्यादि प्रसिद्ध स्थानांतील जगदंबेच्या मूर्ति ह्या पार्वती देवीच्याच आहेत. कोंकणांत तर दर गांवीं एक ना एक नांवाचें शिवलिंग त्याचप्रमाणें शिवपत्नी पार्वतीचीं एक ना एक नांवाची मूर्ति व मंदिर दिसून येतेंच.

गोमंतक अथवा गोवा–गोवें हा कोंकणचाच एक भाग असल्यामुळें तिथेंही ठिकठिकाणीं शिव–पार्वतीचीं अनेक स्थानें आढळून येतात. त्यांत प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें श्रीक्षेत्र मंगेशीचा ‘ श्रीमंगेश ’ आणि श्रीक्षेत्र कवळें येथील ‘ श्री शांतादुर्गा ’ हीं स्थानें विशेष प्रसिद्ध असून स्मार्तपंथी सारस्वत ब्राह्मणांचीं तर तीं शेकडों वर्षांचीं पूज्यस्थानें आहेत.

त्या देवस्थानांची माहितीच इथें द्यावयाची आहे, तेव्हां त्यांच्या स्थल-वर्णनापासूनच आरंभ करूं.

: १ :

दक्षिणचें नंदनवन

भारताच्या उत्तरेकडील काश्मीर प्रांताला हिंदुस्थानचें नंदनवन म्हणतात. पण भारतांत हें नंदनवन एकटेंच नाहीं. दक्षिण भारतांतील गोमंतक उर्फ गोव्याचा भूभाग हाही असाच नंदनवन या नांवाला शोभणारा आहे. निदान महाराष्ट्राचें नंदनवन हें नांव त्याला खासच शोभतें.

उत्तरेस तेरेखोलच्या खाडीपासून दक्षिणेस कारवार जिल्ह्यापर्यंत आणि पूर्वेस सह्याद्रीच्या पठारावरील बेळगांव व उत्तर कानडा जिल्ह्यांतील सरहद्दी-पासून पश्चिमेस सिंधुसागरापर्यंत याचें क्षेत्र असून, त्याचा विस्तार जवळ जवळ ६५ मैल लांब व ४० मैल रुंद एवढा आहे. एकंदर क्षेत्रफळ सुमारें १५०० चौरस मैल होईल.

राज्यव्यवहाराच्या सोईसाठीं याचे सध्यां तेरा विभाग केलेले असून आज (सन १९६४) तो भारताचा एक केंद्रशासित भाग आहे.

एका लेखकानें या भूमीचें वर्णन करतांना म्हटलें आहेः—

‘एकीकडे मस्तकावर सह्याद्रींतील कुवेशीच्या कडेकपारीच्या कुशींतून कोसळणाऱ्या कालीच्या दूधसागराचा जलप्रपात आणि दुसरीकडे पायतळीं अथांग हिंदी महासागराच्या फेनधवल लहरींचा खोडकर खळखळाट यांच्या-मध्यें हा चिमुकला प्रांत वसलेला आहे.

सारीच कोकणपट्टी रम्य असली तरी कल्पवृक्षाच्या गर्द रांगांनीं वेष्टन घातलेली, सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांपासून चंद्रसूर्याच्या प्रकाशांत चम्‌चम् करणाऱ्या वालुकामय दर्याकांठापर्यंत पसरलेली, सुजला, सुफला, नितांत रमणीय निसर्गश्रीबरोबरच विविध मानवी कर्तृत्वानेंही नटलेली अशी ही भूमि त्यांतही वैशिष्ट्यपूर्ण आहे.’ (— वि. वृत्त)

दुसरा एक या भूमीच्या कुशींतच वाढलेला लेखक म्हणतोः—

'तीरावरील वृक्षराजीनें नजर केलेलीं छत्रचामरादि राजचिन्हें धारण करून आजूबाजूच्या हिरव्यागार शेतांतून रौप्यमेखलेप्रमाणें शोभणाऱ्या दुथडी भरून चालणाऱ्या अशा आमच्या नद्या; व्यवस्थित चौरसांमुळें एखाद्या विस्तीर्ण पटासारखीं दिसणारीं हिरवीं–पिवळीं शेतें, त्यांतूनच मधून मधून विखुरलेल्या व बुद्धिबळाच्या मोहऱ्यांप्रमाणें लहान मोठ्या लवणगिरीचे व गवताच्या गंजीचे तांडे, पश्चिमेकडे सायंकाळीं हिंदी महासागरांतून मांगल्याची दर्शक अशी आरक्तवर्ण छटा देणाऱ्या सवित्याची ती सुंदर प्रतिमा; पूर्वेकडे आमच्या रक्षणार्थ एखाद्या भिंतीप्रमाणें खडा असलेला नेहमीं नीलवर्ण शोभणारा आमचा प्रिय सह्याद्रि; आणि त्यांतूनच मधून मधून झुळझुळणाऱ्या प्रवाहांनीं डोळे आणि पोट यांना मनमुराद खुराक देत असलेला जीवनरस; चोहोंकडे चवऱ्यांप्रमाणें दिसणारे व आमुलाग्र उपयुक्ततेनें थबथबलेले नारीकेलरूपी कल्पवृक्ष; इतस्ततः विखुरलेली व मधून मधून डोकें उंच करून जणूं पहारा करीत असलेलीं आमचीं देवालयें इत्यादि सौंदर्याभरणें ज्या भूमीनें लेइलीं आहेत अशी आजन्म तारुण्यांतच विहरणारी ही आमची प्रिय मातृभूमि आहे.

(—प्रो. सावर्डेकर)

प्रस्तुत देवस्थानें हीं या प्रदेशाच्या साधारण मध्यभागीं असून तिथें जाण्याला पुढील मार्ग आहेतः—

(१) मुंबईपासून हा भाग सुमारें २५० मैलांवर आहे. मुंबईकडच्या लोकांना तिथें समुद्रमार्गानें जावयाचें तर कोकण किनाऱ्याला वाहतूक करणाऱ्या आगबोटींनीं सुमारें वीस तासांचा प्रवास करावा लागतो. पणजी हें तिकडचें उत्कृष्ट बंदर आहे. तिथें उतरून पुढें मोटारीनें जातां येतें.

(२) खुश्कीच्या मार्गानें जावयाचें तर दक्षिण रेल्वेनें पुण्यावरून बेळगांव व तिथून लोंढ्यापर्यंत जाऊन पुढें लोंढा–मुरगांव रेल्वेनें मधल्या 'कुळें' या सोईस्कर स्थानकावर उतरून पुढें मोटारीनें जातां येतें. किंवा बेळगांव–पणजी हा तिनई घाटांतून जाणारा मोटार मार्गही चांगला आहे. बेळगांवहून मोटारनें सावंतवाडीला जाऊन तिथून पुढें दोडामार्ग किंवा सातार्डामार्गानें हद्दीवरच्या पेडणें तालुक्यापर्यंत व तिथून कोळवाल–म्हापसा-

वेती या मार्गानें पणजी गांठतां येते. अलीकडे कोकणांतूनच मुंबई ते पणजी थेट वाहतूकही ‘ एस. टी. ’ नें व इतर कांहीं कंपन्यांनीं ठेवली आहे. अशी सोय वेती ते मुंबई व पुणेंपर्यंतही आहे.

(३)घांटावरच्या पुणें–कोल्हापूरच्या मंडळीला रेल्वे किंवा मोटारमार्गच सोईचे व जवळचे आहेत.

(४) दक्षिणेकडील मद्रासच्या बाजूच्या लोकांना रेल्वे व मोटारमार्गाप्रमाणेंच कारवारकडचा जलमार्गही आहे.

(५) विमानानें तर आतां हीं देवस्थानें म्हणजे परसांतील भाजी झाली आहे !

: २ :

गोमंतकांतील सारस्वत ब्राह्मण

भारताच्या इतर भागांतील लोकसमूहांत ज्याप्रमाणें आर्य व आर्येतर ह्या दोन जमातींचें मिश्रण दिसून येतें तसेंच गोमंतकांतही आढळतें. इथें आलेले आर्य –विशेषतः त्यांतला ब्राह्मण समाज–हा उत्तरेकडूनच इकडे आलेला आहे. यांच्या आगमनाची पौराणिक कथा पुढीलप्रमाणें आहेः–

श्री विष्णूचा सहावा अवतार परशुराम यानें आपल्या पित्याच्या वधाचा सूड म्हणून उत्तर व पूर्व भारतांतील तत्कालीन अनेक क्षत्रियांचा संहार केल्यावर त्याच्या हातून झालेल्या त्या मनुष्यवधाच्या प्रायश्चितार्थ त्यानें यज्ञ करण्याचें ठरविलें. पण सह्य पर्वताच्या पूर्वेकडील भूमि त्यानें पूर्वींच कश्यप ऋषीला दान दिलेली असल्यामुळें त्याला या यज्ञासाठीं नवी भूमि उत्पन्न करावी लागली. ती त्यानें सह्याद्रीच्या पश्चिमेच्या सागराला मागें हटवून मिळविली आणि तिथें नवी वसाहत करून एक नवें जगच निर्माण केलें.

ही नूतन भूमि उत्तरेस शूर्पारक (सोपारा) पासून दक्षिणेस मलबार-पर्यंत पसरलेली असून तिचे उत्तर, दक्षिण व मध्य असे विभाग कल्पिले तर गोमंतकाचा रत्नागिरी जिल्ह्याला लागून असलेला भाग हा साधारण मध्य-भागांत येतो. हा भाग सृष्टिसौंदर्यानें विशेषच नटलेला असून या भागांतच त्यानें आपला यज्ञ करण्याचें ठरविलें.

ह्या यज्ञाला ब्राह्मण पाहिजे होते ते परशुरामानें उत्तरेंतून आणले. त्यांना सारस्वत हें नांव पडण्याचें कारण पूर्वी एकदां त्यांची वस्ती पंजाबांतील सरस्वती नदीच्या कांठीं होती किंवा सारस्वत या नांवाचा ऋषि त्यांचा पूर्वज किंवा सांप्रदायप्रमुख होता असें म्हणतात.

हे ब्राम्हण नंतर पूर्वेकडे सरकून बंगालच्या बाजूला जाऊन राहिले होते. परशुरामानें त्यांना बंगाल्यांतून-त्रिहोत्रपुर येथून-इकडे बोलावून आणलें असें कोकणांतील या सारस्वतागमनाच्या कथेंत सांगितलें आहे.

हे ब्राम्हण पुढें गोमंतकांतच स्थायिक झाले आणि आपल्या जुन्या मायभूमींतून इतर लोकांनाही इकडे आणून त्यांनीं गांवचे गांव वसविले. गोमंतकांतील प्राचीन ग्रामसंस्थाही त्यांनींच स्थापन केल्या असें दिसतें. या ग्रामसंस्थांच्या अनुषंगानें त्यांचा गोमंतकाच्या राजकारणाशींही वेळोवेळां संबंध येत असे. त्यामुळें प्राचीन कालच्या राजवटींत त्यांनीं अनेक वेळां महत्त्वाची राजकीय कामगिरी केल्याचेंही आढळून येतें.

या प्रदेशावर पुढें मुसलमानांची धाड आल्यावर भारताच्या इतर भागांप्रमाणेंच येथल्या हिंदूंना जे हाल भोगावे लागले त्यांत हे ब्राह्मणही सांपडले होतेच. त्यानंतर पोर्तुगीज अंमलांत तर त्यांच्यावरील जुलमाचा कहरच झाला. त्यामुळें त्यांचीं बरींचशीं कुटुंबें स्थलांतर करून उत्तर-दक्षिण-पूर्व या दिशांना परागंदा झालीं. काश्मिरांतील सारस्वत जसे मुसलमानांच्या छळाच्या वेळीं काश्मिरांतून बाहेर पडून भारताच्या 'उत्तर प्रदेशांत' स्थायिक झाले तसेच हे सारस्वत गोमंतकांतून बाहेर पडून ठिकठिकाणीं स्थायिक झाले. तथापि त्यांचीं कुलदैवतें गोमंतकांतच असल्यामुळें त्यांचा गोमंतकाकडे असलेला ओढा केव्हांच कमी झालेला नाहीं.

या समाजांतील लोक आज मुंबई, इंदूर, ग्वाल्हेर, इत्यादि उत्तर

आणि सावंतवाडी, कर्नाटक, कारवार इत्यादि दक्षिण भारताच्या अनेक प्रांतांतून विखुरलेले आहेत. तथापि त्यांचीं गोमंतकांतील कुलदैवतें हा त्या सर्वांना सांधणारा एक भक्कम दुवा आहे. आणि तो इतका दृढ व आकर्षक आहे, कीं ऐतिहासिक कालापापासून आतांपर्यंत या समाजांतील अनेक कुटुंबें गोमंतकाबाहेर नांवलौकिक कमावून राहिलेलीं असलीं तरी त्यांची आयुष्यांतून एकदा तरी आपल्या कुलदैवतांचें दर्शन घेण्याची इच्छा पुरी झाल्याशिवाय त्यांना समाधान वाटत नाहीं.

अयोध्या–मथुरा–माया–काशी–कांची–अवंतिका इत्यादि भारतांतील स्थानें अखिल हिंदूंना पूज्य व मोक्षदायक वाटतात, तद्वत् या कर्तबगार समाजाला गोमंतकांतील श्रीमंगेश, शांतादुर्गादि 'स्थळें' पवित्र व मोक्षदायकच नव्हे तर ऐहिक कल्याणासाठीं साधनीभूत वाटतात. त्यामुळें अनेक संपन्न लोकांनींच नव्हे तर सामान्य लोकांनीही तेथल्या स्थानिक सारस्वतांप्रमाणेंच या देवस्थानांना अनेक प्रकारच्या देणग्या दिल्या आहेत, म्हणूनच तीं आज कोकणांतील इतर देवस्थानांच्या मानानें विशेष संपन्न व वैभवशाली असल्याचें दिसून येतें. असो.

वर दिलेली पौराणिक कथा बाजुला ठेविली आणि ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला, तरी 'सरस्वती'चे लाडके लोक म्हणून या समाजाची प्रसिद्धि आजही आहे. पूर्वी पंतोजी म्हणजे ग्रामशिक्षक व कुळकर्णी म्हणजे गांवचा लेखनिक व हिशेबनवीस या नात्यानें त्यांनीं महत्वाची कामगिरी केलेली आहे आणि आजही ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत या समाजांतले कितीतरी लोक उच्च स्थानीं विराजमान झालेले दिसून येतात.

: ३ :

श्री शिव-पार्वतीचें गोमंतकांत आगमन

परमेश्वर जळीं–स्थळीं-काष्ठीं–पाषाणीं–भरलेला आहे. 'स्थिरचर व्यापुनि अवघें तो जगदात्मा दशांगुळें उरला' असें त्याचें वर्णन आपल्या परिचयाचें

आहेच. पण त्याबरोबरच परमेश्वर कधीं कधीं अवतार घेऊन विशिष्ट स्थळीं वास्तव्य करीत असतो ही समजूतही मानवसमाजांत दृढमूल झालेली आहे.

आपल्या पुराणग्रंथांतून या अवतारांच्या अनेक कथा आहेत आणि निर्गुण परब्रह्मानें एकदा साकार रूप धारण केल्यावर मानवी भावभावनांचे आरोप त्याच्यावर होणेंही साहजिकच आहे.

ब्रह्मा–विष्णु–महेशांच्या व त्यांच्या अवतारांच्या पुराणांतील कथांकडे या दृष्टीनें पाहिलें असतां भक्तांचीं हृदयें उचंबळविण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत कां व कसें प्राप्त झालें आहे याचा उलगडा होऊं शकतो. प्रस्तुत श्री शिवशंकर व पार्वती यांचें वास्तव्य कैलास पर्वतीं असतांही त्यांनीं या पृथ्वीवरील गोमंतकाच्या नंदनवनांत प्रवेश करून तिथें कां वास्तव्य केलें ही कथा आपल्याला पहावयाची आहे. स्कंद पुराणांतील सह्याद्रिखंडांत ती आलेली आहे. तिचा सारांश पुढें देत आहों—

एकदा नारद मुनि भुवनत्रयांत फिरतां फिरतां महादेवाच्या कैलास या निवासस्थानीं प्राप्त झाले असतां त्यांनीं श्री शंकरांना विचारलें :-

भगवन्त्वामहं प्रष्टुमिच्छाम्येकं वदस्व मे।

केन केनावतीर्णोऽसि रूपेण त्वं महीपते ॥ १ ॥

म्हणजे "भगवन्, आपण महीतलावर कोणकोणत्या रूपानें अवतीर्ण झालां तें जाणण्याची मला मोठी इच्छा आहे, ती कृपा करून पुरी करा"

ह्यावर त्या विष्णुभक्त नारदाला श्री शंकर म्हणाले :-

"फार चांगला प्रश्न केलास. या पृथ्वीतलावर मी अनेक ठिकाणीं नानारूपांनीं प्रगट झालों आहें. पण त्यांतल्या त्यांत गोमंतकांतील 'मांगिरीश' या रूपानें मी प्रगट झालों ती कथा मौजेची आहे.

त्याचें असें झालें, एकदा मी इथेंच पार्वतीसह द्यूत खेळत होतों. खेळतां खेळतां मी आपण होऊनच तिच्याकडून हरला गेलों; आणि तिला सांगितलें कीं ज्या अर्थी या द्यूतांत माझा पराभव झाला त्या अर्थी मी आतां इथें राहत नाहीं. तुम्हां बायकांचा सहवासच घातक असतो. तेव्हां मी आपला तपासाठीं दूर वनांत निघून जातों !

असें म्हणून तिथून निघालों तो प्रथम कृष्णा-वेण्यासंगमीं जाऊन राहिलों. तिथें ' संगमेश्वर ' म्हणून माझी प्रसिद्धि झाली. त्यानंतर परशुरामानें निर्माण केलेल्या परशुराम क्षेत्रांत जावें असें मनांत आलें म्हणून तिथून निघालों तो चंपावतीला आलों. तिथें ' रामेश्वर ' म्हणून माझी प्रसिद्धि झाली. तिथून पुढें हरिहरला गेलों तिथें ' हरिहरेश्वर ' झालों. आणि तिथून मग गोमंतक पर्वतावर गेलों. त्या ठिकाणीं ' गोमंतकेश ' अशी माझी प्रसिद्धि झाली. इंद्रादि देव, कपिलादि सिद्धही तिथेंच येऊन राहिले. सह्य पर्वतांतून



निघालेल्या पांच नद्या तिथें एकत्र झालेल्या असल्यामुळें तें स्थान मोठें रमणीय आहे, तसें पुण्यप्रदही आहे. सप्तकोटेश्वर या नावांनें तें पुढें प्रसिद्ध झालें आहे.

कांहीं काल तिथें वास्तव्य केल्यावर तिथून निघालों नि 'अघाशी' नदीवरील 'कुशस्थळी' नगरींत आलों. तिथें 'लोमश' नांवाचा माझा एक भक्त होता. तो एकदां स्नानासाठीं नदींत उतरला असतां त्याला एका नक्रानें धरलें. तेव्हां त्यानें माझी प्रार्थना केली. मीही एका ब्राह्मणाचें रूप घेऊन धनुर्बाण, त्रिशूळ आणि परशूसह त्याच्या मुक्ततेसाठीं धांवून गेलों आणि त्या नक्राच्या पाठींत शूल खुपसून लोमशाची मुक्तता केली.

त्या भयंकर नक्राच्या दाढेंतून मुक्तता झाल्यावर लोमशानें माझी अनेक प्रकारें स्तुति केली आणि मीही प्रसन्न होऊन त्याला म्हणालों, "बाबा, मी प्रसन्न झाल्यावर माणसाला काय कमी पडणार आहे ? तुला पाहिजे तें मागून घे." लोमशानें दुसरें कांहीं न मागतां मी यापुढें तिथेंच रहावें असें मागणें केलें; आणि मलाहि वाटलें कीं तिथें रहावें, म्हणून मी त्याला म्हणालों :–

"गोमंतक पर्वतावर टिकठिकाणीं शेकडो लिंगें आहेत, तिथें मी अंशरूपानें आहेंच; आतां इथेंही राहतों. इथें जे माझें भजनपूजन करतील त्यांचीं कसलींही दुःखें असतील तीं नाश पावतील. तूं आतां जा आणि इच्छित कामांचा उपभोग घे. शेवटीं निर्वाण झाल्यावर तूं माझ्या स्वरूपांत येऊन मिळशील, असा माझा तुला आशीर्वाद आहे."

लोमशानें नक्रालाही उत्तम लोक मिळावा अशी प्रार्थना केल्यावरून त्यालाही मी माझ्या स्वरूपांत समाविष्ट करून टाकलें.

तिकडे पार्वती मी निघून गेल्यामुळें फार कष्टी झाली. तिनें नाना प्रकारें शोक आरंभिला, पण तिच्या सखींनीं तिला सांगितलें कीं "असा शोक करून काय उपयोग ? चल आपण त्या परममंगल शिवाला शोधून काढूं." त्याप्रमाणें पार्वतीनें पुष्कळ वर्षेपर्यंत अनेक पर्वत नि रानेंवनें पालथीं घातलीं. पण तिला माझा कुठेंच पत्ता लागेना.

मग तिनें एक युक्ति केली. आधींच ती मूळची सुंदर; पण आतां तिनें देवांनाही मोह पाडील असें आणखीन् सुंदर रूप धारण केलें आणि हातांत



वीणा घेऊन गायन आणि नृत्यपूर्वक माझी प्रार्थना करीत ती पृथ्वीतलावर हिंडूं लागली.

"शिवशंकर सर्वात्मन्
नीलकंठ नमोऽस्तुते।
भक्तप्रियोऽसि देवेश
मामनाथमुपेक्षसे ॥१॥

त्वया त्यक्ता न जीवामि
तरुत्यक्ता लता इव।
किं न स्मरसि कल्याणं
मदर्थे यत्कृतं त्वया॥२॥

दक्षः प्रजापतिः पूर्वं
त्वया दग्धः सयज्ञकः।
तदा मया पिताचासौ न
स्मृतः त्वद्वियोगतः॥३॥

पतिं त्वाममहायाथ
नान्यंवरमहं वृणे।
इत्युक्त्वा सा तदा
गौरी शंकरार्थे
परिभ्रमन् ॥ ४ ॥"

ही व अशा प्रकारची प्रार्थना तोंडानें चालली आहे आणि हात वीणेच्या तारा छेडताहेत; मधून मधून

'हे देवदेवेश ! हे देवदेवेश !' अशा हांका मोठ्यानें मारते आहे; अशा स्थितींत फिरतां फिरतां ती पश्चिम दिशेला मघां सांगितलेल्या अघाशी नदीच्या तीरावर आली.

मीही आतां तिची थोडीशी गंमत करण्याचा विचार केला; आणि एका भयंकर व्याघ्राचें रूप घेऊन तिथल्या रानांत इकडे तिकडे फिरूं लागलों.

पार्वती तिथें आली ती नदीवर स्नानासाठीं जाऊं लागली, तेव्हां मी तिला आडवा झालों आणि शेंपूट हालवीत भयंकर शब्द करून तिच्या अंगावर धांवलों !

लांगूलमुद्यम्य सुतीक्ष्णदंष्ट्रः ।
कालातिवेगः कवलीकृतांगः ।
नखैर्विभिदन्नवतिं तथोग्रैः ।
यथा महाकालवपुर्धराधरः ॥ १ ॥

पार्वती भयचकित मुद्रेनें माझ्या त्या व्याघ्ररूपाकडे पाहूं लागली आणि मोठ्यानें ओरडून

"पंचवक्त्र महादेव त्राहि मां शरणागतम्" अशी तिनें **माझी प्रार्थना केली.** पण या वेळीं ती इतकी भिऊन गेली होती कीं हे प्रार्थनेचे शब्दही तिला नीट उच्चारतां येत ना !

"त्राहिमां हे गिरीश" असें तिला म्हणावयाचें होतें; पण तिच्या तोंडून शब्द निघाले ते "त्राहि मांगीश" एवढेच !

मलाही आतां तिला दर्शन द्यावयाचेंच होतें. तेव्हां मी माझें व्याघ्ररूप टाकून दिलें आणि मूळचें रूप धारण करून तिच्यापुढें उभा राहिलों. तेव्हां तिला जो आनंद झाला तो काय वर्णावा ! तिच्या तोंडून शब्द निघेना. पण तशाही अवस्थेंत ती म्हणाली :—

दृष्टोसि भगवन् साक्षात् तपः पारे प्रतिष्ठितः ।
गृण्हंति वेदास्ते रूपं ह्यप्राप्यं मनसा सह ॥ १ ॥
मन्यवे ते नमस्कुर्यां येन दग्धो मनोभवः ।
नमो विषमनेत्राय येन भिन्नो महासुरः ॥ २ ॥

नमोऽस्तु शूलहस्ताय येन भिन्नो गजासुरः ।
प्रसीदेश प्रसीदेश संसार्णवतारक ॥ ३ ॥इ०इ०

मीही मग तिला सांगितलें, " देवि, मी तुझी केवळ परीक्षा पाहण्यासाठींच तुझा त्याग केला होता. आतां तुला मी टाकणार नाहीं. चल माझ्याबरोबर आणि तुझ्या इच्छेस येतील ते भोग घे."

देवी पार्वती म्हणाली—" बरें तर; आतां आपण इथेंच वास करूं. माझ्या तोंडून '**मांगीश**' असे शब्द बाहेर पडलेच आहेत; तेव्हां तेंच तुमचें इथलें नांव होऊंदे. हें नांव जे घेतील त्यांचीं सर्व दुःखें नाहींशीं करा." मीही तिची ती इच्छा पूर्ण केली आणि तिथेंच राहूं लागलों.

अशा रीतीनें श्रीशंकर–पार्वतीचें गोमंतकांत वास्तव्य झाल्यावर त्यांचे गणही मग तिथेंच येऊन राहिले; आणि त्या स्थानाला कालांतरानें क्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालें. असो.

वर सांगितल्याप्रमाणें भगवान शंकराची व पार्वतीची भेट झाली तेव्हां श्रीशंकरांनीं आपल्या तपांत विघ्न करणाऱ्या पार्वतीला प्रथम बराच दोष दिलेला पुराणान्तरीं वर्णिला आहे. पण पुढें तिच्या तपःप्रभावाचीही प्रशंसा करून त्यांनीं तिला आपण या क्षेत्रांत रहावयाचें, पण एका ठिकाणीं रहावयाचें नाहीं असें सुचविल्याचेंही तिथेंच सांगितलें आहे. पार्वतीनें ही अट कबूल केली. आणि दोघेंही तिथें राहूं लागलीं हें वर सांगितलेंच आहे. पण त्यांचा असा समेट झाला तरी दोघांचीं निवासस्थानें मात्र भिन्न होतीं. श्रीशंकर 'कुशस्थळीं'त राहिले तर पार्वती 'केळोशी' (कर्दलीवन) येथें राहूं लागली.

: ४ :

गोत्र-प्रवरांची थोडी माहिती

गोमंतकांतील श्रीमंगेश नि शांतादुर्गा यांचे 'महाजन' नि भक्त

मुख्यतः सारस्वत ब्राह्मणांतील वत्स, कौंडिन्य आणि कौशिक गोत्रीय आहेत. या गोत्रांची माहिती आम्ही पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे. पण तत्पूर्वी गोत्र म्हणजे काय हेंच पुष्कळांना माहीत नसतें, म्हणून त्यासंबंधी थोडी माहिती या प्रकरणांत देऊं.

गोत्र या शब्दाचा धात्वर्थ **गो** म्हणजे गाई त्यांचें रक्षण करणारें म्हणजे अगदीं प्राथमिक अर्थानें त्यांचें थंडीवाऱ्यापासून निवारण करणारें स्थान--गोठा--असा आहे.

त्यापुढचा या शब्दाचा यौगिक अर्थ ज्या ठिकाणीं गायींचे कळप असतात असें स्थान.

त्याच्यापुढचा अर्थ नुसता कळप अथवा संघ असा होऊन त्यानंतर त्याला **वंश** असा अर्थ प्राप्त झाला.

गोत्र शब्दाशीं संबद्ध असा दुसरा शब्द **प्रवर** असा असून त्याचा मूळ धात्वर्थ (वृ-पसंत करणें) ' विशिष्ट प्रकारची निवड ' असा आहे. पुढें अशी निवडलेली व्यक्ति-उत्तम अथवा नांवाजलेली श्रेष्ठ व्यक्ती खुद्द पितरच असा अर्थ त्या शब्दाला प्राप्त झाला.

पाणिनीच्या कालीं गोत्र-प्रवरांचा संबंध ' अपत्यं पौत्रप्रभृति गोत्रम् ' असा मानला जात असे. म्हणजे प्रवर ऋषि हे गोत्र-ऋषींचे--बाप-आजे-पणजे असे पितर होत- अशी समजूत रूढ झाली होती. पण वेदग्रंथांतील त्या त्या ऋषींच्या कुलाचा बिचार केला असतां ही समजूत पूर्णांशानें बरोबर होती असें म्हणतां येत नाहीं. मात्र 'पितर' या शब्दानें केवळ जन्य जनकसंबंधच लक्षांत घ्यावयाचा असें नसून ' जनिता चोपनीताच यश्चविद्यां प्रयच्छति । अन्नदाता भयत्राता पंचैते पितर-स्मृताः ॥' या वचनाप्रमाणें उपनयन करणारा आचार्य, आणि विद्यादान करणारा गुरु यांनाही 'पितर' या संज्ञेंत बसवितां येईल असें मानलें म्हणजे बऱ्याच अडचणींचा निरास होईल.

महाभारताच्या शांतिपर्वांत भीष्मांनीं तर चक्क सांगून टाकलें आहे कीं 'गुरुर्गरीयान् पितृतः मातृतःच इति मे मतिः' म्हणजे गुरु हा मातापितरां-पेक्षांही श्रेष्ठ होय असें माझें मत आहे.'

तात्पर्य, गोत्र-प्रवर संबंध हा कांहीं अंशीं पितृपरंपरा व पुष्कळ अंशीं गुरुपरंपरा अशा मिश्र स्वरूपाचा आहे. म्हणून पुत्र-वंशज-शिष्य, पिता-पूर्वज-आचार्य, त्याचप्रमाणें वंश अथवा कुल व संप्रदाय हे शब्द समव्यास घेतले म्हणजे भिन्नवंशीय अगर भिन्नप्रादेशीय ब्राह्मणांत समान गोत्रें असणें साहजिकच आहे हें लक्षांत येईल. इत्यर्थ असा कीं महाराष्ट्रीय दशविध ब्राह्मणांन प्रादेशिक अथवा आहारावरून पडलेले भेद आज दिसत असले तरी पूर्वी जन्मावरून जाती ठरण्याच्या पूर्वी ते केवळ सांप्रदायभेद होते आणि म्हणूनच आजच्या बदललेल्या मनूंत त्यांचें ऐक्य होण्याला प्रत्यवाय असूं नये, निदान त्यांच्यांतला श्रेष्ठ-कनिष्ठ भाव तरी ताबडतोब नष्ट होणें सर्वांच्याच हिताचें आहे. असो.

फार प्राचीन काळीं आर्य लोक उत्तर ध्रुव प्रदेशीं राहत होते. तेथें हिमप्रलय होऊन सर्व वस्तुजात गडप होऊन गेलें–तेव्हां ते आपली उरली सुरली चीजवस्त घेऊन खालीं उतरले, ते मध्य आशियांत कांहीं वर्षें राहून कालांतरानें पूर्व व पश्चिमेकडे वसाहती करीत गेले.

पूर्वेकडे निघालेल्या लोकांपैकीं कांहीं लोक त्यानंतर कांहीं काळानें त्या वेळच्या अतिपूर्वेकडील म्हणजे सिंधु नदीच्या परिसरांत व त्यानंतर गंगा–यमुनांच्या परिसरांत येऊन स्थायिक झाले, असें अलीकडच्या संशोधनानें सिद्ध झालें आहे.

इथें हा उल्लेख पांच दहा ओळींत करतां आला. पण हे आर्य लोक उत्तरध्रुव प्रदेशीं असल्यापासून गंगा–यमुनांच्या परिसरांत येऊन स्थायिक होईपर्यंतचा हा काल हजारों वर्षांचा होता! त्या कालांत त्यांच्यांतल्या अनेक विद्वानांनीं देवतास्तुतिपर अनेक सूक्तें रचलेलीं होतीं किंवा त्यांना स्फुरलेलीं होतीं. तेच वेद होत.

या वेदांतील या अनेकानेक सूक्तांच्या कर्त्यांचीं वा द्रष्टयांचीं नांवेंही पुढें सामान्य लोकांच्या लक्षांत राहणें कठीण झालें तेव्हां त्या साऱ्या सूक्तांचें-निदान त्यांतल्या निवडक सूक्तांचे एकीकरण करून त्यांचा एक संग्रह बनविण्यांत आला. आणि त्याला 'संहिता' असें नांव देण्यांत आलें.

यानंतरच्या 'सूत्रकालां'त या संहितेंतल्या निदान प्रमुख अशा सूक्तकर्त्या, अथवा मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या नांवाची स्मृति सदैव रहावी म्हणून तीं विशिष्ट सूत्रांत गोंविलीं गेलीं आणि त्यांचा उच्चार विशिष्ट प्रसंगीं करण्यांत यावा असा दंडक घालण्यांत आला. वर सांगितलेले प्रवर–ऋषि ते हेच होत. गोत्र–ऋषि हे त्या प्रवर–ऋषींचे विशिष्ट कालीं मान्यता पावलेले त्या त्या सांप्रदायाचे शेवटचे ऋषि असें मानलें जातें. 'ज्ञानकोश'कार केतकरांच्या मतें "कुलांचे प्रवर ऋषि म्हणजे ज्यांनीं ऋग्वेदांतील सूक्तें रचलीं व त्या सूक्तांनीं अग्नीची स्तुति केली असे पूर्वज. हे थोडे व ठराविकच आहेत. कारण वैदिक सूक्तांचे कर्ते हे एकदा ठरलेले आहेत ते वाढूं शकणार नाहींत..."

"त्याचप्रमाणें "गोत्र-ऋषि" हा मंत्रकृत् किंवा मंत्ररचना करणारा असलाच पाहिजे असें नाहीं. तो प्रवर-ऋषींचा एखादा विख्यात वंशज असल्यामुळें त्याच्यापासून उत्पन्न झालेली शाखा किंवा नवीन घराणें त्याचें नांव लावूं लागले एवढेंच"

यानंतरच्या पौराणिक कालांत व ऐतिहासिक कालांत या गोत्र–ऋषींच्या वंशजांची वा शिष्यसंप्रदायाची वाढ होत गेली तरी कांहीं अंशीं त्यांच्यांतील आध्यात्मिकतेमुळें पण पुष्कळ अंशीं ऐतिहासिक दृष्टीकडच्या दुर्लक्षामुळें त्यांच्या पिढ्यान् पिढ्या होऊन गेल्या तरी त्यांच्यांतल्या विद्वान वा कर्तृत्ववान स्त्रीपुरुषांची नांवेंही कोणी जतन करून ठेविलीं नाहींत. फक्त श्राद्धपक्षादिकांच्या वेळीं पितरांच्या नांवानें पिंडप्रदान किंवा तर्पण करतांना व विवाहप्रसंगींच्या कन्यादानाच्या वेळीं ज्या नांवांचा उच्चार करावा लागतो तेवढींच नांवें फक्त शिल्लक राहत गेलीं! अर्थात् जसजशा पिढ्या वाढत गेल्या तसतशीं त्यांतील कांहीं नांवेंही गळत गेलीं आणि आज तर कित्येकांना बापाच्या किंवा फार तर आजाच्या नांवापलीकडे आपल्या पूर्वजांचीं नांवेंही माहीत नसतात अशी स्थिति आहे!

: ५ :

वत्स, कौंडिन्य आणि कौशिक

'गोत्र' म्हणजे काय हें सांगितल्यावर आतां मागें सांगितलेल्या 'वत्स' 'कौंडिन्य' व 'कौशिक' गोत्रांची थोडी अधिक माहिती या प्रकरणांत देऊं.

वत्सगोत्र

या गोत्राचा प्राचीन ऋषींशीं संबंध पाहिला तर तो भृगु–च्यवन–गृत्स-मद–जमदग्नि इत्यादींशीं दिसून येतो. कारण या गोत्राचे प्रवर ऋषि सांगितले आहेत ते येणेंप्रमाणें:—"भार्गव–च्यावन–आप्न वान-और्व–जामदग्न्य इति"

जमदग्नीच्या कुळांतच पुढें वत्स हा नामांकित ऋषि झाला. त्याच्या पित्याचीं नांवें सेनजित–प्रतर्दन–गुरुक्षेप–कण्व अशीं वेगवेगळीं दिलेलीं आढळतात. यावरून जमदग्नि व वत्स यांच्या दरम्यान बऱ्याच पिढ्या गेलेल्या असाव्या. एका ठिकाणीं 'वत्स' ऐवजीं 'वत्सद्रोह' असें नांव असून त्याला 'उरुक्षयाचा पुत्र' असें म्हटलें आहे.

दुसऱ्या एका ठिकाणीं वत्स हा एक वैश्य मंत्रकार होता असें म्हटलें आहे. 'कण्वा'चा पुत्र 'वत्स' याला एकदां 'मेधातिथीनें शूद्रपुत्र म्हटलें, त्यावरून मोठा वाद झाला आणि वत्सानें अग्निदिव्य करून आपलें ब्राह्मणत्व सिद्ध केलें अशीही कथा आहे.

ऐतिहासिक कालांत इतर गोत्रांप्रमाणेंच या वत्स गोत्रांतही अनेक थोर पुरुष होऊन गेले आहेत. सुप्रसिद्ध ज्ञानेश्वर महाराज हे वत्सगोत्रीच होते.

प्रस्तुत सारस्वत ब्राह्मणांपुरतेंच पहावयाचें तर अलीकडच्या काळांत शिंद्यांचे सुप्रसिद्ध दिवाण व सेनापति जिवबादादा बक्षी (जिवाजी विश्राम केरकर) उत्तम संस्कृततज्ञ, कादंबरीकार व मुम्बईतील सुप्रसिद्ध 'विविध--ज्ञान विस्तार' मासिकाचे उत्पादक रामचंद्र भिकाजी गुंजीकर, न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग, अध्यात्मविद्याप्रचारक रामचंद्र शंकर टाकी इत्यादि या गोत्रांतील पुरुष उल्लेखनीय आहेत.

कौंडिन्य गोत्र

" वासिष्ठ–मैत्रावरुण–कौंडिन्य " असे या गोत्राचे प्रवर–ऋषि आहेत. अर्थात् ' वसिष्ठ ' ' मित्रावरुण ' आणि कुण्डिन हे पुरुष या कुलांत अथवा सांप्रदायांत होऊन गेलेल्या पुरुषांत फार प्रसिद्ध होते. पैकीं ' वसिष्ठ ' आणि ' मित्रावरुण ' हीं नांवें वैदिक वाङ्मयांत वारंवार आलेलीं आहेत. ' कुण्डिन ' हें नांव त्या मानानें अलीकडचें आहे.

ऋग्वेदाचें सातवें मंडळ ' वसिष्ठा ' च्या नांवावर आहे.

मित्रावरुण हें जोडनांव दिसतें. याच्या मुलांचीं नांवें ' अगस्ति ' व ' वसिष्ठ ' अशीं एका ठिकाणीं आढळतात. ' वरुण ' हा मंत्रद्रष्टा ऋषि होता हें ऋग्वेद १०, १२४ वरून सिद्ध आहे.

कुण्डिन हा या कुलांतील मित्रावरुणानंतरच्या बऱ्याच कालांतला मंत्रकार होय. याच्या नांवावरूनच या कुलाला पुढें ' कौंडिन्य' हें नांव पडलें

कौंडिन्य हा ' शाण्डिल्य ऋषीचा शिष्य व कौशिकाचा गुरु असा उल्लेख एका ठिकाणीं आहे. यावरून कुण्डिनाच्या पश्चात् या कुलांतील एकाद्या पुरुषानें शाण्डिल्य संप्रदाय स्वीकारला असावा; तसेंच त्यानें कौशिक सांप्रदायिकांना आपल्या शिष्यवर्गांत घेतलें असावें असें दिसतें.

पांडवांच्या अश्वमेध यज्ञांत भाग घेणाऱ्या ऋषींत **कौंडिन्य व लोमश** हीं नांवें आढळतात.

ऐतिहासिक काळांतील प्रसिद्ध व्यक्तींत या गोत्राची मंडळी थोडी आहे. पण ' हिंदवी स्वराज्या ' चा छत्रपति शिवाजी महाराजांचा संकल्प बहुतांशीं सिद्धीस नेणाऱ्या पेशव्यांच्या घराण्यांनें हा तोटकेपणा भरून काढला आहे.

कौशिक गोत्र

" वैश्वामित्र–आघमर्षण व कौशिक " अशा या कुलांतील पुराणपुरुषांना विशेषनाम-विशेषणें लाविलेलीं आढळतात. म्हणजे या कुलांतील फार दूरचा पूर्वज ' विश्वामित्र ' हा असून 'अघमर्षण' व 'कुशिक' हे त्याच्या वंशजांत किंवा सांप्रदयांत मोडत.

विश्वामित्र हा प्रथम राजर्षि होता तो ब्रह्मर्षि झाला अशी कथा आहे. या कथेंत वसिष्ठ-विश्वमित्रांचें शेंकडो वर्षांचे भांडण वर्णिलेलें आहे. त्यावरून या कुलांत ब्रह्मर्षि होण्याची आकांक्षा अति तीव्र होती,ती पहिल्या किंवा आद्य विश्वमित्राच्या बाबतींत साध्य झाली नाहीं, तरी त्याच्या वंशांतल्या त्याच नांवाच्या पुढल्या पुरुषानें ती साध्य करून घेतली असें अनुमान काढल्यास तें अयुक्तिक वाटूं नये.

कौशिक हा विश्वामित्र ब्रह्मर्षि झाल्यावर त्याच्या कुलांत उत्पन्न झालेला ऋषि होय. सत्यवचनाचा अतिरेक झाल्यामुळें याचा चोरांनीं वध केला, अशी महाभारतांत एक कथा आहे. यानें अथर्ववेदाचें गृह्यसूत्र केलें. हा चांगला गवईही होता.

ऐतिहासिक व आधुनिक कालांत तर या गोत्राच्या अनेकानेक व्यक्तींनीं काळाच्या वाळवंटावर आपलीं पावलें उमटवून ठेवलीं आहेत व आजही या गोत्राच्या अनेक व्यक्ति निरनिराळ्या क्षेत्रांत नांव कमावून आहेत. 'आपटे,' 'फडणीस,' 'कोल्हटकर, 'खरे,' 'फाटक,' 'बर्वे,' 'भावे' इत्यादि नांवें याची साक्ष देतात.

सारस्वत ब्राह्मणांपैकीं पुढील व्यक्ति विशेष उल्लेखनीय आहेतः—

रामचंद्र मल्हार (रामचंद्र मल्हार सुकथनकर) हे कोंकणांतील आरवली गांवचे रहिवासी, ग्वाल्हेरच्या शिंद्यांचे दिवाण होते. कवळें व मंगेशी या दोन्ही देवस्थानांना स्वतः व पेशव्यांमार्फत इनामें देऊन हीं देवस्थानें त्यांनीं समृद्ध केलीं.

नारो राम मंत्री (नारायण रामचंद्र रेगे) हे कोंकणांतील कोचरें गांवचे रहिवासी. लहानपणीं कवळें येथें श्रींच्या दर्शनास आले असतां त्यांना वरघांटीं जाण्याचा दृष्टांत झाला. त्याप्रमाणें ते साताऱ्याला गेले आणि तत्कालीन शाहू छत्रपतींच्या दरबारांत मंत्रिपद मिळवून मोठ्या वैभवाला चढले. या वैभवाच्या काळांत पुनः श्रीस्थळीं येऊन त्यांनीं सध्यांचें भव्य देवालय, त्याचप्रमाणें देवलयाच्या मागची अग्रशाळा वगैरे बांधण्याची व्यवस्था केली. त्यांच्या ह्या स्पृहणीय कामगिरीची कृतज्ञतापूर्वक जाणीव रहावी म्हणून त्यांच्या वंशजांनाही आज श्रीस्थळीं पहिल्या प्रतीचा मान देण्यांत येतो.

कोकणांतील बांदें गांवचे कुळकर्णी प्रख्यात संतकवि 'सोहिरोबानाथ आंबिये,' 'भर्तृहरीच्या 'शतकत्रया' वरील समश्लोकी टीकेचे कर्ते 'जुवे'चे 'तुकाराम बाबा वर्दें,' ज्योतिष, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रपारंगत विद्वान 'माशेलचे' 'महेश्वरभट्ट सुखटणकर' आणि आधुनिक कालांतील सुप्रसिद्ध भिषग्वर्य 'डॉ. भाऊ दाजी (रामकृष्ण विठ्ठल) लाड,' अव्वल इंग्रजींतील एक नामांकित शिक्षक व समाजसेवक 'गोविंद नारायण मडगांवकर,' सुप्रसिद्ध संस्कृत पंडित व विद्वन्मुकुटमणि 'डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर,' अत्यंत गरिबीच्या अवस्थेंतून व्यापाराच्या जोरावर लाखोपति झालेले 'नारायण वासुदेव दाभोळकर', वयाच्या अठराव्या वर्षी आपल्या जन्मभूमींतून बाहेर पडून नंतर इंग्रजी शिकून एम्. ए. झालेले व इंग्रजी अमदानींत मोठमोठीं हुद्यांचीं कामें केलेले आणि 'वेदार्थयत्न' कर्ते 'शंकर पांडुरंग पंडित,' पहिले भारतीय हायकोर्ट जज्ज, कुलगुरु व राष्ट्रीय सभेचे एक संस्थापक 'न्या. मू. काशिनाथ त्रिंबक तेलंग', रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर बेनेगल रामराव व त्यांचे बंधु, भारताचे यूनोमधील प्रतिनिधि 'न्या. मू. नरसिंगराव,' ओरिसाचे माजी राज्यपाल 'यशवंतराव सुखठणकर,' मुंबईच्या राज्यपाल श्री. विजयालक्ष्मी पंडित, मुंबई हायकोर्टाचे 'न्या.मू. साजबा शंकर रांगणेकर,' न्या. मू. 'पाटकर' 'राजाध्यक्ष,' व 'बावडेकर,' मुंबई युनिव्हर्सिटीचे माजी कुलपति 'न्या.मू. गणेश नारायण चंदावरकर' व त्यांचे पुत्र 'बॅ. विठ्ठल ग. चंदावरकर' इत्यादि नांवें सदैव स्मरणांत ठेवण्यासारखीं नाहींत असें कोण म्हणेल ?

: ६ :

त्रयाणां शर्माणाम्

[देवशर्मा, शिवशर्मा आणि लोमशर्मा]

मागें एका प्रकरणांत 'लोमशा' ला गोमंतकांतील अघाशी नदीतीरा-

वरील कुशस्थळींत श्रीशंकरांचें दर्शन झाल्याचें सांगितलें तें माघ शु॥ १५ ला चंद्रग्रहण असतांना झालें होतें. त्यावेळचें श्रीशंकरांचें स्वरूप श्रीशिवमहात्म्यांत वर्णिल्याप्रमाणेंच होतें. मात्र याच वेळीं श्रीशंकरांनीं लोमशाला सांगून टाकलें होतें कीं:–

हे अघाशी कलियुगीं माझें स्थान।
तरी वसेन शक्तिसंपन्न ॥
येथें मातें भजेल कोण।
त्याचें विघ्न नाशीन क्षणें ॥

(मां. म. ४–१०५)

श्रीशंकरांचें मूळ वसतिस्थान कैलास पर्वतावर असून या पृथ्वीतलावर बाण अथवा लिंग हें आपलें प्रतीक त्यांनीं ठरवून टाकलें आहे. अर्थात् त्यांची पूजाअर्चा होते ती लिंगस्वरूपांतच होते; आणि हीं लिंगेंही केव्हां, कुठें आढळतील याचा नेम नसतो. अघाशी नदीवरील या गांवांतील श्रीशिवप्रतीकही प्रथम असेंच लोकांना अज्ञात होतें.


पुढें कांहीं वर्षांनीं 'वत्सगोत्री देवशर्मा' या नांवाचा एक ब्राह्मण सपत्नीक श्री रामेश्वरच्या यात्रेला आला होता. तो परत जातांना वाटेंत अघाशी नदीवर थांबला आणि संगमावर स्नान करून गांवांत गेला. तेथलें सृष्टिसौंदर्य पाहून त्याला कांहीं दिवस तेथेंच रहावेंसें वाटलें. तो 'सत्यवाक्' आणि 'विजितेंद्रिय' असल्यामुळें तेथल्या गांवकऱ्यांचीही त्याच्यावर भक्ति बसली आणि त्यांनीं त्याला आग्रहानें राहवून घेतलें.

पुढें एके दिवशीं मध्यान्हसमयीं एक गाय त्या नदींत प्रवेश करून बुडी मारून तिथें बराच वेळ राहिली आणि नंतर बाहेर आली असें त्यानें पाहिलें.

दुसऱ्या दिवशीं हाच प्रकार त्याच्या दृष्टीस पडला. तिसऱ्या दिवशीं त्यानें सूक्ष्मपणें अवलोकन केलें तों ती गाय तशीच बुडी मारून कांहीं काल तिथें राहते नि नंतर वर येते असें त्याला आढळलें.

त्यानें गांवकऱ्यांना ती हकीगत सांगितली आणि हा काय प्रकार आहे

असें त्यांना विचारलें. पण कोणालाही त्या कोड्याचा उलगडा करतां येईना. शेवटीं आपणच याचा शोध लावावा म्हणून तो देवशर्मा एक दिवस ती गाय नित्याप्रमाणें मध्यान्हीं तिथें आली असतां तिचें शेंपूट धरून नदींत उतरला आणि तिच्या बरोबरच बुडाला. तों काय चमत्कार! तिथें एक दिव्य शिवलिंग असून ती गाय त्यावर आपल्या दुधाची धार सोडीत आहे असें त्याला दिसलें. त्यानें मोठ्या भक्तिभावानें हात जोडून त्या लिंगस्वरूप शिवाची स्तुति केली:-



देवदेव जगन्नाथ सर्वज्ञ परमेश्वर।
गौरीश भूतनाथाद्य रक्ष मां शशिशेखर॥

भूतनाथ श्रीशंकर प्रसन्न झाले आणि त्याला दर्शन देऊन म्हणाले:-

"वरं वरय भद्रं ते प्रयच्छामि तव द्विज"

म्हणजे "हे ब्राह्मणा, तुझें कल्याण असो. मी प्रसन्न आहें. तुला काय पाहिजे असेल तें माग."

देवशर्मा म्हणाला:- "प्रभो, तुम्ही प्रसन्न झालां आहां. पण मी तुम्हांला कोणत्या नांवानें इथें हांक मारूं मला सांगा. तुमच्या पायांशीं एकनिष्ठपणें रहावें एवढीच माझी इच्छा आहे.

श्रीशंकर म्हणाले :- "मला मांगीश म्हणतात, आणि या तीर्थाचें नांव 'कपिल' असें आहे. म्हणूनच ही कपिला धेनु नित्यशः इथें येऊन आपल्या दुधानें मला अभिषेक करते."

देवशर्मा सद्गदित होऊन त्या 'श्रीमांगीशाला' प्रणिपात करता झाला आणि पुढें गांवकऱ्यांत ही वार्ता प्रसृत झाल्यावर त्याच्याच हस्तें तें शिवलिंग पाण्याच्या बाहेर काढून त्या गांवांत त्याची विधिपूर्वक स्थापना करण्यांत आली.

देवशर्माहि मग तिथेंच घरदार करून राहिला आणि त्याचें अनुकरण करून आणखीहि बरेच लोक 'लब्धकाम' होऊन तिथें स्थायिक झाले. असो.

श्रीशिवाचीं जशीं 'ईश्वरान्त' अनेक नांवें आहेत तशींच शिवपत्नी पार्वतीचींहि अनेक नांवें व त्यांच्यासंबंधाच्या कथा पुराणान्तरीं आलेल्या आहेत. जया, विजया, कालिका, महामाया, भद्रकाली, भगवती, भैरवी इत्यादि तिचीं अनेक नांवें विशिष्ट प्रसंगांवरून पडलेलीं आहेत.

दुर्गा ही युद्धदेवता म्हणून पुराणान्तरीं वर्णिलेली आहे. कौरव-पांडव-युद्धाच्या वेळीं श्रीकृष्णांनीं युद्धारंभीं अर्जुनाला या दुर्गेचेंच स्तवन करण्याविषयीं सांगितलें होतें.

शांता हें नांव पडण्याचें कारणहि पुराणान्तरीं आलेलें आहे तें असें—

पूर्वी एकदां श्रीशिव व विष्णु यांच्यामध्यें भयंकर युद्ध झालें. दोघेहि समान पराक्रमी असल्यामुळें कोणी कोणास हार जाईना. श्रीशिवांनीं पाशुपतास्त्राचा मारा चालविला तर श्रीविष्णूनीं सुदर्शन चक्र सोडलें. पण या उभयतांच्या संग्रामांत जगाचा प्रलय होण्याचा प्रसंग येऊन ठेपला तेव्हां ब्रह्मदेवानें जगाचा नाश होऊं नये म्हणून आदिशक्ति जगदंबा म्हणजेच दुर्गा हिची प्रार्थना करून तिला मध्यस्थी करण्याविषयीं विनविलें. तेव्हां ती अकस्मात् त्या दोन्ही योद्ध्यांच्या मध्यें येऊन उभी राहिली आणि एका

हातानें श्रीविष्णूला व दुसऱ्या हातानें श्रीशिवाला बाजूला करून तिनें हा संग्राम मिटविला.

अशा रीतीनें उभयतांना ' शांत ' करण्यांत तिनें यश मिळविलें म्हणून तिला श्रीशांतादुर्गा असें नांव प्राप्त झालें.

'मांगीश माहात्म्यांत' हें नांव पडण्याचें कारण दिलें आहे तें असें:—

मागें सांगितलेल्या लोमश या शिवभक्ताला श्रीशंकरांनीं दर्शन दिल्यावर कांहीं दिवसांनीं हा लोमश ब्राम्हण समिधा आणण्यासाठीं केळोशी वनांत गेला असतां तिथें आकाशवाणी झाली कीं:-

' तुझेया वचना लागोन। मज भेटला हर भगवान। येरवीं हिंडतां त्रिभुवन। श्रम दारुण मजप्रति ॥ १॥ माझें दुःख कष्ट शमन। वियोग दुःख गेलें येथून। यावरी 'शांत' झालें मन। तेंचि अभिधान शांतादुर्गा ॥ २॥ दुःख शांति आणि सुख-विश्रांति। या लागीं शांतादुर्गा मूर्ति। तुज सांपडेल वनाप्रति। तेचि प्रतिष्ठा करावी ॥३॥ कुशस्थळीं प्रगटेल हर। तेव्हां मी मिळैन केळोशीसी साचार। तेचि स्थळीं स्थापोनि पूजोपचार। करितां वंशोद्धार मी करीन ॥ ४॥'

यावरून लोमशाला श्रीशंकराप्रमाणेंच पार्वतीदेवीचें दर्शन—मूर्तिरूपानें केळोशीस झालें होतें असें दिसतें.

पुढें देवशर्मा हा औत्तरीय ब्राम्हण रामेश्वरच्या यात्रेला आला तेव्हां त्याच्याबरोबर कौशिकगोत्री लोमशर्मा व कौंडिन्यगोत्री शिवशर्मा असे त्याचे दोन नातेवाईक (लोमशर्मा हा मेहुणा—आणि शिवशर्मा हा भाचा) त्याच्या बरोबर होते. देवशर्म्याप्रमाणेंच तेही वेदशास्त्रसंपन्न, सत्त्वस्थ व सच्चरित्र होते. देवशर्मा कुशस्थळीं स्थायिक झाल्यावर तेही तिथेंच राहूं लागले. देवशर्म्यानें कुशस्थळीं श्री मांगीशाची स्थापना केल्यावर लोमशर्म्याला केळोशी येथें तशाच कांहीं अकल्पित प्रकारानें जगदंबेची मूर्ति सांपडली आणि त्यानें तिची केळोशींत स्थापना केली. साहजिकच तो तिची विशेष आराधना करूं लागला आणि अशा रीतीनें कुशस्थळी आणि केळोशी हीं गोमंतकांतील शिवपार्वतीचीं स्थानें पुढें कांहीं दिवसांनीं चांगलींच नांवारूपास आलीं.

★

: ७ :

आपत्काल आणि स्थलांतर

मागें सांगितल्याप्रमाणें देवशर्मा, शिवशर्मा नि लोमशर्मा यांचीं कुटुंबें आणि त्यांच्या अनुकरणानें वत्स, कौंडिन्य नि कौशिकगोत्री अनेक सारस्वत ब्राह्मण आणि त्या त्या गांवच्या ग्रामसंस्थेंतील अनेक लोक श्रीमंगेश व शांता-दुर्गा यांची मोठ्या भक्तिभावानें पूजा–अर्चा करून सुखासमाधानानें नांदत असत.

या कालांत कोंकणांत आणि त्याबरोबरच गोमंतकांतहि अनेक राज-वटींचे बरे वाईट अनुभव लोकांना घ्यावे लागले. परकीयांचे हल्लेहि वारंवार झाले. तथापि तेथल्या ग्रामसंस्था देवस्थान–केंद्राधिष्ठित असल्यामुळें त्यांना विशेषसा धक्का बसला नव्हता.

पण पुढें मुस्लीमांचें व त्यांच्यामागून पोर्तुगीजांचें आक्रमण झाल्यावर मात्र या देवस्थानांवरहि जबरदस्त आघात होऊं लागले.


मुसलमानांचें महाराष्ट्रावरील आक्रमण इसवी सनाच्या तेराव्या शत-काच्या अखेरीस झालें. पण त्यावेळीं त्यांची बाधा गोमंतकासारख्या एका बाजूला असलेल्या प्रदेशाला फारशी झाली नव्हती. ती पुढें उत्तरेंतील मुस्लीम बादशाहीपासून फुटून निघालेल्या बहामनीशाहीनें विजयनगरच्या साम्राज्याचा अंत केल्यावर विजापूरच्या ‘आदिलशाही’ नें गोमंतकांत सत्ता प्राप्त करून घेतल्यावर येथल्या लोकांना जाणवूं लागली.

या आदिलशाहीच्या कारकीर्दींत गोमंतकांत अनेक हुद्यांच्या जागांवर स्थानिक सारस्वत ब्राह्मण असलेले दिसून येतात. देवस्थानांचे ‘महाजन’ तर बहुधा तेच होते. पुढें या शाहीचा जाच असह्य झाल्यावर कित्येकांनीं या जाचांतून सुटण्यासाठीं दक्षिणेस मलबारच्या बाजूला शूर वीर म्हणून गाजलेल्या कांहीं पोर्तुगीज लोकांना आमंत्रण केलें. पण त्याचा परिणाम पुढें इकडील लोकांना धर्मसंबंधानें विलक्षण त्रास होण्यांत झाला आणि त्यांची

'आगींतून निघून फुफाट्यांत' पडल्यासारखी स्थिति झाली.

इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत गोमंतकांत पोर्तुगीज पाद्र्यांकडून जे अत्याचार झाले त्यांत इतरांपेक्षां तत्कालीन ब्राम्हणांचीच ससेहोलपट जास्त झाली. कारण हा वर्ग बुद्धिमान असून तत्कालीन इतर समाजांवर त्याचें चांगलें वजन असे. त्यामुळें समाजपुरुषाचा हा मेंदूच उखडून टाकला म्हणजे विकलांग झालेला बाकीचा समाज सहज आपल्या भक्ष्यस्थानीं पडेल असें त्याकालच्या फिरंगी पाद्र्यांना वाटणें व त्यांनीं त्याप्रमाणें हात धुवून ब्राम्हणांच्या मागें लागणें साहजिक होतें. परिणामीं अनेक ब्राम्हण कुटुंबें ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याऐवजीं देशत्याग करून गोमंतकाच्या बाहेर पडलीं आणि कित्येक गोमंतकांतच पण त्यावेळीं फिरंग्यांच्या अमलांत नसलेल्या प्रदेशांत निघून गेलीं.

या वेळची एक अशी आख्यायिका सांगतात कीं तत्कालीन पोर्तुगीजांचा एक बडा पाद्री गांवचे गांव ख्रिस्ती करीत चालला होता; तो कुशस्थळी या श्रीमंगेश–देवाच्या गांवानजीक येऊन ठेपला. उद्यां या गांवावर त्याची धाड येणार हें ऐकून श्रींचे तत्कालीन महाजन मोठ्या फिकिरींत पडले. त्यांनीं श्रींची करुणा भाकली, 'देवा, तूंच आतां यांतून काय तो मार्ग दाखव' तेव्हां त्यांना त्या रात्रींच दृष्टांत झाला कीं " माझें वास्तव्य सर्वत्रच आहे, तेव्हां तुम्ही भिण्याचें कारण नाहीं. त्यांतून तुम्हांला येथील माझ्या लिंग–प्रतीकाचें



संरक्षण करावयाचें असेल तर तात्काळ तें उचलून घेऊन बाहेर पडा आणि तें जिथपर्यंत नेववेल तिथपर्यंत नेऊन पुढें नेणें अशक्य होईल तिथेंच खालीं ठेवून त्याची पुनः स्थापना करा.

याप्रमाणें दृष्टान्त होतांच तेथले प्रमुख महाजन लगोलग एकत्र जमले. त्यांनीं तें शिवलिंग उचलून पालखींत घातलें. तेथल्या परिवार देवताही बरोबर घेतल्या आणि रातोरात तिथून निघून त्या वेळीं प्रतापराव सरदेसायांच्या ताब्यांत असलेल्या ' अंत्रूज ' प्रांताकडे धूम ठोकली.

पळतां पळतां वाटेंत त्यांना ' प्रियोळ ' गांव लागलें. हा गांव फिरंगी हद्दीपासून दूर होता. तिथें त्यांनीं पालखी खालीं उतरली आणि आंतील शिवलिंग एका पवित्र जागीं ठेवून तिथें त्याचें अर्चन चालू केलें.

इकडे तो धर्मवेडा पाद्री दुसऱ्या दिवशीं कुशस्थळी गांवांत शिरला तों त्याला तिथें दिसलें कीं ज्या जागीं श्रीचें लिंग होतें ती जागा नजीकच्या टेंकडीची माती वर पडून अगदीं झांकून गेली आहे ! कारण श्रींची स्वारी तिथून निघून जातांच नजीकची ती टेंकडीही कोसळून त्या जागीं पडली होती ! असो.

वर सांगितल्याप्रमाणें प्रियोळ गांवीं श्रींचें अर्चन चालू झाल्यावर श्रींचे इतर महाजनही पुढें थोड्याच दिवसांनीं तिथें आले. त्यांनीं तीच जागा श्रींच्या पुंनःस्थापनेला योग्य व सुरक्षित आहे असें पाहून ती मोकासा घेतली, तिथें लहानसें देवालय उभारलें आणि शके १४८२ रौद्रनाम संवत्सरीं (सन १५६०) श्रींची परिवार देवतांसह विधिपूर्वक स्थापना केली.

पुढें कांहीं वर्षांनीं पोर्तुगीजांचें धर्मवेड कमी झालें; त्यांना सावंत-भोसले-पेशवे इत्यादींकडून जबरदस्त तडाखेहि बसले. त्यामुळें ' अंत्रूज ' प्रांत जरी पुढें त्यांच्या ताब्यांत आला तरी या देवस्थानच्या वाटेला ते गेले नाहींत.

पेशवे सरकारकडून या देवस्थानाला ती जागा व इतरहि अनेक इनामें मिळालीं आणि सर्व स्थिरस्थावर झालेंसें पाहून या देवस्थानच्या तत्कालीन महाजनांनीं इतर परिवार-देवतांसह यथाकाल या एकंदर देवस्थानाला मोठें वैभव प्राप्त करून दिलें.

आज याचा कागदोपत्रीं उल्लेख ‘संस्थान श्रीमंगेश’ असा होत असून सभोंवतालचा सर्व भाग ‘मंगेशी’ या नांवानें ओळखला जातो.

कुशस्थळी येथील श्री मंगेश देवाच्या या स्थलांतराबरोबरच केळोशी येथील श्री शांतादुर्गा देवीचेंहि स्थलांतर तिच्या कौशिक गोत्री महाजनांकडून करण्यांत आलें आणि तिची स्थापना प्रियोळपासून सुमारें ८–१० मैलांवर असलेल्या जरा आडबाजूच्या कवळें (कैवल्यपूर) या गांवीं करण्यांत आली.

हें देवस्थानहि पुढें चांगलें भरभराटीस आलें. त्यालाही पेशवे दरबारांतून इनामें मिळालीं आणि श्रीच्या अनेक भक्तांकडून तिथें निरनिराळ्या सोई करण्यांत आल्या.

आज तिथें स्मार्त सांप्रदायाच्या गौडपादाचार्यांचा मठ, आद्य श्रीशंकराचार्यांचें मंदिर, संस्कृत विद्यालय, मराठी शाळा इत्यादि बऱ्याच धार्मिक व सांस्कृतिक संस्था आपापलें नियोजित कार्य करीत असतात.

: ८ :


प्रस्तुत श्रीस्थलवर्णन

मागें सांगितलेल्या गोमंतकांत जाण्याच्या मार्गांपैकीं कोणत्याही मार्गानें गोमंतकांत प्रवेश केला तरी तिथून श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा या देवस्थानांकडे सरळ मोटारनें जातां येतें.

श्रीमंगेशचें देवस्थान पणजी–बेळगांव या हमरस्त्यावर असून पणजीपासून सुमारें १४–१५ मैलांवर रस्त्यावरच एक भव्य दरवाजा लागतो, त्यांतून आंत प्रवेश करतांच थोड्या अंतरावर मुख्य मंदिराचा कळस दृष्टोत्पत्तीस येतो आणि तसेंच पुढें गेलें असतां मंदिरासमोरील तळीं आणि कांहीं पायऱ्या चढून वर जातांच समोरील नौबतखाना, प्रासादांतील बाजूचे मोठे दरवाजे, सभोंवतालच्या विस्तीर्ण दुमजली अग्रशाळा, उच्च दीपस्तंभ आणि मधलें


पटांगण पाहून मंदिराच्या भव्यतेची कल्पना येते.

श्रीदेवस्थानचे आवारांत सडकेपासून देवालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या डाव्या बाजूस एक छोटेसें वनभोजनमंदिर आहे. तिथें कार्तिक, मार्गशीर्ष व वैशाख मासीं श्रींची स्वारी वनभोजन व वसंतपूजा यांनिमित्त मोठ्या समारंभानें येत असते. हा समारंभ प्रेक्षणीय असतो. प्रस्तुत स्थळीं श्रीमंगेशाची स्थापना होऊन आज जवळ जवळ चारशें वर्षें झालीं आहेत. या चारशें वर्षांत या स्थलाचें वैभव नित्यनूतन वाढत्या प्रमाणांत आहे आणि श्रीस्थळीं आणि त्याच्या आसपास ज्या सुधारणा होत आहेत त्यामुळें त्याच्या सौंदर्यांत व आकर्षकतेंत भर पडत आहे.



श्रींच्या गर्भागारांत मुख्य स्थानीं सतत ५२ नंदादीप तेवत असतात. शिवाय श्रीगणपति, भगवती व काळभैरव यांच्याकडे एकेक आणि श्रीग्रामपुरुष, मूळकेश्वर श्रीलक्ष्मीनारायण, श्रीवीरभद्र व श्रीसातेरी निरंकाराकडे

प्रत्येकीं दोन याप्रमाणें तेरा नंदादीप रात्रंदिन पेटत असतात. त्याचप्रमाणें देवालयांतील व देवालयाच्या बाहेरील विशिष्टस्थळीं एकंदर ९ सांजवाती सूर्यास्ताच्या वेळीं पेटवून रात्रौ दरवाजे बंद होईपर्यंत प्रज्वलित असतात. 'श्रीशिवशर्म्या'च्या देवालयांतही रात्रंदिवस नंदादीप पेटत असतो. खांबावरील दिवा रोज सूर्यास्ताच्या वेळीं पेटवून सर्व रात्र प्रज्वलित ठेवण्या-बद्दलच्या खर्चाची व्यवस्था मुंबईचे श्री. आत्माराम सगुण साळगांवकर यांनीं केलेली आहे.




कवळें येथील श्रीशांतादुर्गेचें स्थान वरील बेळगांव पणजी मार्गापासून जरा दूर आहे. देवालय पूर्वाभिमुख असून उभय बाजूंनीं भव्य अग्रशाळा आहेत, समोर दीपस्तंभ व प्राकाराचे खालीं सुंदर तलाव आहे.

प्राकाराच्या मुख्य दरवाजावर रोज त्रिकाल चौघडा झडत असतो. हा चौघडा मुंबईचे (मूळचे वेंगुर्लें येथील) कै. नारायण वासुदेव दाभोळकर यांनीं ठेवलेला आहे.

स्मार्त सांप्रदायी सारस्वत ब्रह्मवृंदांच्या गुरुस्वामींचा मठहि येथून नजीकच आहे. शिवाय श्रीआद्यशंकराचार्यांचें स्मारक म्हणून कांहीं वर्षांपूर्वी येथें एक मंदिर बांधलेलें असून संकेश्वर-करवीर मठातर्फें तिथें एक संस्कृत विद्यालय चालू आहे.

या दोन्ही देवालयांच्या आंतील वातावरणही मन प्रसन्न करणारें व भक्तिभाव उचंबळून आणणारें असतें.



: ९ :

श्रीस्थळांतील मुख्य व परिवार देवता

श्रीमंगेश देवस्थानांतील मुख्य व परिवार देवता पुढीलप्रमाणें आहेत—

(१) **श्रीमंगेश**–हा अर्थात लिंगरूप असून गाभाऱ्यांत आहे. श्रीशंकराच्या पौराणिक वर्णनाप्रमाणें तयार केलेली त्याची उत्सवमूर्ति वेगळी आहे. शिवाय स्नानोत्तर लिंगावर कवच चढवून त्याचें अलंकारयुक्त पौराणिक स्वरूपही दाखविलें जातेंच.

(२) **ग्रामपुरुष**–श्रीदेवशर्मा हा श्रीमंगेशाच्या पूर्वस्थळांतील–कुशस्थळींतील–वत्सगोत्री ब्राह्मणांचा मूळपुरुष, याची प्रतिमा समोरच्या चौकावर श्रीनंदिकेश्वराच्या जवळच स्थापिलेली आहे.

(३) वर सांगितलेल्या चौकावर उजवे बाजूस **श्रीगणपति** व डावे बाजूस **श्रीभगवति** यांची स्थापना केलेली आहे.

(४) श्रींच्या देवालयाच्या बरोबर पाठीमागें '**मूळकेश्वर**' असून त्याच्या उजव्या हाताला दोन मंदिरें आहेत. त्यांपैकीं एका मंदिरांत **श्रीलक्ष्मीनारायण-सूर्यनारायण व गरुड** या देवता असून दुसऱ्या मंदिरांत '**श्रीवीरभद्र**' आहे.

(५) देवालयाच्या समोरील तलावाच्या बरोबर समोर '**काळभैरव**' आहे.

(६) तलावाच्या एका बाजूला एक मंदिर आहे त्यांत **श्रीसातेरी** व **निरांकार** ऊर्फ '**निरंकार**' या दोन देवता असून त्या मंदिराच्या दरवाजापुढें '**क्षेत्रपाळ शिला**' आहे.

(७) श्रीमंगेश देवालयाच्या उजव्या बाजूस **श्रीशिवशर्मा** म्हणजे **देवशर्म्याच्या** बरोबरचा कौंडिन्य गोत्रीयांचा मूळपुरुष याची प्रतिमा आहे.

(८) या देवस्थानांत '**नाईक स्वामी**' नांवाचे एक परम शिवभक्त

होऊन गेले. ते ज्या देव्हाऱ्यांत श्रीमंगेश-मूर्ति पूजित असत तो देव्हारा व त्यांच्या पादुका असलेलें एक मंदिर नजीकच आहे.

श्रीक्षेत्र कवळें येथील **श्रीशांतादुर्गा** देवस्थानांतील मुख्य व परिवार देवता पुढील प्रमाणें आहेतः—

१) देवालयांतील गाभाऱ्यांत पट्टासनावर मुख्य दैवत **श्रीशांतादुर्गा** हिची. मूर्ति असून जवळच श्रीशिवाचें प्रतीक **श्रीशिवलिंग** आहे.

२) मुख्य देवालयालगतच दुसरें एक लहान देवालय असून त्यांत मुख्य-स्थानीं **श्रीनारायण** व जवळच **श्रीगणपति** यांच्या मूर्ति आहेत.

३) ह्याच बाजुस देवालयापासून थोड्या अंतरावर पारिजातक वृक्षाचा पार असून तेथें '**बारा वीर**' व '**भगवती**' यांचें वास्तव्य आहे असें मानतात.

४) देवालयाचे महाद्वाराचे समोर दीपस्तंभाचे लगत '**श्रीक्षेत्रपाळ**' आणि प्राकाराचे खालीं सज्जाचे डावीकडे एका लहानशा घुमटींत **श्रीग्रामपुरुष** आहे. हा ग्रामपुरुष म्हणजे श्रीशांतादुर्गा देवीचे 'कुळावी' जे कौशिकगोत्री त्यांचा मूळ पुरुष **लोमशर्मा** होय. हा अर्थात् केळोशी येथें राहणारा होता. तिथेंच त्यानें या देवीची स्थापना केली होती. पुढें 'फिरंग्यां'च्या धामधुमीच्या वेळीं मुख्यदेवी श्रीमंगेश देवाबरोबरच तिकडून 'अंत्रुज' प्रांतांतील या सुरक्षित जागीं आणण्यांत आली तेव्हां या मूळ पुरुषाचीही इकडे स्थापना करण्यांत आली.

५) उत्तर बाजूचे अग्रशाळेस उत्तराभिमुख सज्जा आहे तें '**देवचाराचें**' स्थान आहे. त्यास '**म्हारबाबा सज्जा**' असें म्हणतात.

★

: १० :

उपदैवतें उर्फ पालवी देवता

मुख्य कुलदेवतांशिवाय त्या देवतांशीं संबद्ध अशीं कांहीं उपदैवतें

असतात. आणि मुख्य देवतेचे उपासक परंपरेनें या उपदैवतांपैकीं कांहीं विशिष्ट देवतांनाही भजत असतात.

'पाल'–'पालव' याचा अर्थ सहाय्य असा आहे. 'पालवी' म्हणजे अर्थात् सहाय्यभूत किंवा उपकुलदेवता होत. मुख्य कुलदेवता भक्तजनांचें कल्याण करतांना या पालवी देवतांचें साह्य घेतात अशी या मागची कल्पना आहे. त्यामुळें या दोन्ही कुलदेवतांचे भक्त त्यांच्या पालवी देवतांचेंही अर्चनादि कृत्य करतात.

श्रीमंगेश


श्रीमंगेशाच्या महाजनांच्या या पालवी देवता म्हणजे (१) **श्रीमहालक्ष्मी** (२) **श्रीमहालसा** व (३) **श्रीकामाक्षा** या होत. पैकीं श्रीमहालक्ष्मीचें देवालय बांदिवडें (सासष्टींतील मूळ गांव कोलवें) येथें असून श्रीमहालसेचें देवालय म्हाडदोळ (सासष्टींतील मूळ गांव वेर्णे) येथें आहे. **कामाक्षी** ही शिरोडें (सासष्टींतील मूळ गांव राय) येथें आहे.

श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा या दोन्ही देवतांच्या 'कुळाव्यांना **श्रीमहालक्ष्मी व श्रीमहालसा** यांचें दर्शन घेतलेंच पाहिजे असें मानतात.


या पालवी देवता शक्तिस्वरूपीच असल्यामुळें 'शिवा' बरोबरच 'शक्ती' चीही उपासना करावी हाच या एकंदर उपास्य प्रकारांचा मथितार्थ आहे.

या देवतांशिवाय श्रीमंगेशाच्या या पंचक्रोशींत (१) **श्रीनारसिंह** (२) **श्रीनागेश** व (३) **श्रीरामनाथ** हीं देवस्थानेंही प्रसिद्ध आहेत आणि त्यांची रचना व तेथील पूजाप्रकारही श्रीमंगेश व श्रीशांतादुर्गा या देवस्थानांप्रमाणेंच आहेत.

श्रीमंगेश देवालयाचा **खांब**, श्रीशांतादुर्गा देवालयाचा **घूड**, श्रीमहालक्ष्मी देवालयाचा **चौक**, श्रीमहालसा देवीचें **स्थळ**, आणि श्री नागेश देवाची **तळी** हीं या पांच देवतांचीं वैशिष्ट्यें आहेत. तसेंच श्री कामाक्षा देवीचा **गण** हेंही वैशिष्ट्य आहे.




श्रीदेवी



कौंडिन्य पुरुष




श्रीगणपति




श्रीभगवती




श्रीमंगेश



श्रीग्रामपुरुष, श्रीनंदी



श्रीलक्ष्मीनारायण



खांब

: ११ :

प्रसाद अथवा कौल

आपल्या इष्ट देवतेस आपली इच्छा कळवून अगर आपलीं गाऱ्हाणीं तिच्या पुढें मांडून त्यांचा उलगडा करून घेणें याला देवाचा प्रसाद अथवा कौल घेणें असें म्हणतात.

कोंकणांतील निरनिराळ्या देवस्थानांत ही प्रसाद घेण्याची पद्धति सामान्यतः सारखीच असते. मात्र कौल मागतांना देवाच्या प्रतिमेला लावण्याचीं द्रव्यें ठिकठिकाणीं भिन्न असल्याचें आढळतें. श्रीमंगेश देवस्थानांत ही प्रसाद घेण्याची पद्धति आहे ती अशी—

यजमान स्वतः अगर पुरोहितामार्फत तांबड्या रंगाच्या पोटकुळी (पाटला) नांवाच्या झाडाच्या फुलाच्या पाकळ्या व कळ्या श्रीदेवासमोर असलेल्या ग्रामपुरुष-प्रतिमेस पाण्यानें लावतो. मूर्तीच्या सभोवतीं प्रभावळीस व मूर्तीच्या अंगास बहुतेक ठिकाणीं फुलाच्या पाकळ्या व कवचास भुजापासून हृदयापर्यंत दोन्ही बाजूंस प्रत्येकीं तीन म्हणजे दोन्ही बाजूंस एकंदर सहा कळ्या लावल्या जातात.

या स्थानांची परिभाषा ठरलेली आहे. (उदा०—उजव्या बाजूची प्रभावळीची पांचवी पाकळी-भुजेची कलिका-पतन झाल्यास संकट दूर होईल असें समजावयाचें. इ०) कुटुंबाचें कल्याण अबाधित व्हावें म्हणून, श्रींची राखण नेहमीं असावी म्हणून हे प्रसाद दरवर्षी घेण्याचीही कित्येक महाजनांची रूढि आहे.

हे प्रसाद वर्षांतील पुढील दिवस खेरीज करून दिवसा निर्माल्यविसर्जन झाल्यापासून रात्रौ आरती होईपर्यंत लावतां येतात.

वर्ज्य दिवस पुढीलप्रमाणें आहेतः—

चैत्र :–शुक्ल प्रतिपदा (संवत्सरप्रतिपदा), नवमी, दशमी.

वैशाख :-शुक्ल तृतीया (अक्षय्य तृतीया)

(**ज्येष्ठ** :-महिन्यांत वटपौर्णिमे शिवाय सर्व दिवशीं प्रसाद घेतां येतात.)

आषाढ :-शुक्ल एकादशी, द्वादशी व संक्रांति दिन.

श्रावण :-प्रत्येक सोमवार; शुक्ल पंचमी (नागपंचमी) शुक्ल पौर्णिमा (नारळी पौर्णिमा) वद्य अष्टमी (कृष्णाष्टमी)

भाद्रपद :-शु॥ चतुर्थी (श्रीगणेश चतुर्थी), पंचमी (ऋषि पंचमी), चतुर्दशी [श्री अनंत चतुर्दशी.]

आश्विन :-शु॥ प्रतिपदेपासून दशमी [दसरा] पर्यंत, पौर्णिमा (कोजागरी), व॥ द्वादशी, व॥ चतुर्दशी.

कार्तिक :-शु॥ द्वितीया [भाऊबीज], एकादशी ते पौर्णिमा [परंतु त्रयोदशी निराळ्या दिवशीं आल्यास संध्याकाळीं प्रसाद होतात.]

मार्गशीर्ष :-शु॥ १५ (श्रीदत्तजयंती)

पौष :-मकर संक्रांत; व शेवटचा सोमवार.

माघ :-शु ॥ दशमी; द्वादशी ते पौर्णिमेपर्यंत; वद्य पंचमी; श्रीमहाशिवरात्र.

फाल्गुन :-वद्य प्रतिपदेपासून रंगपंचमीपर्यंत.

(शिवाय **सूर्यग्रहण** किंवा **चंद्रग्रहण** येईल त्या दिवशीं प्रसाद होत नाहींत. **अधिक महिन्यांत मात्र सर्व दिवशीं प्रसाद होतात-**)

श्रीशांतादुर्गेकडे हे प्रसाद श्रीच्या आसनाखालीं कांहीं विशिष्ट कृतीनें तयार केलेला धातूचा पट्टा बसविलेला आहे त्यानें घेतात.

: १२ :

नित्य--नैमित्तिक देवकृत्यें, उत्सव इ.

[श्रीमंगेश]

नित्यक्रम

सकाळीं पांच वाजतां १ तास चौघडा व अर्धा तास इतर वाद्यांची **नौबत**.

सूर्योदयानंतर पुजाऱ्याकडून निर्माल्यविसर्जन.

साधारण आठ वाजल्यापासून (आणि विशेष देवकृत्य असल्यास त्या पूर्वींपासून) देवकृत्यांला प्रारंभ होतो; तीं ११ वाजेपर्यंत चालतात.

नंतर नैवेद्य व दुपारचा चौघडा.

[या वेळीं महाआरती होते; त्यासाठीं महाजन मंडळी व इतर नोकर लोकांस घंटानादानें व नगाऱ्याच्या डंक्यानें अर्धा तास पूर्वीं इशारत केली जाते. तत्पूर्वीं देवास पूजा बांधतात. अर्थात् अभिषेकाचें वगैरे काम बंद झालेलें असतें. महारुद्रादि उर्वरित कृत्य दुसऱ्या दिवशीं वरील वेळीं सुरू होतें.]

संध्याकाळीं ५ वाजतां १ तास चौघडा व ६ वाजतां नौबतीचीं इतर वाद्यें.

[या वेळीं मूलकेश्वर व लोमशर्मा यांच्या देवालयांतही नौबत होते.]

याचवेळीं पाव तास कलावंतिणीचें नृत्यगायनही होत असतें. प्रदोषकाळीं निर्माल्य विसर्जन. तदनंतर नित्यावर्तनें व संध्याकाळचा नैवेद्य.

रात्रौ आठ वाजतां पुराण-कथन व तदनंतर हरिकीर्तन. साडेदहा वाजतां आरती व आरतीनंतर प्रसाद वांटणें वगैरे.

(आरतीनंतर मंत्रपुष्प, वेदघोष व सर्व महाजन मंडळीच्या अभीष्टचिंतनपर प्रार्थना होते. उत्सवांत, महारुद्रांत वगैरे या वेळीं कलावंतिणींचें नृत्यगायनही होतें.)

नित्य सकाळीं श्रीची षोडशोपचार पूजा व रुद्रावर्तनानें अभिषेक (एकावर्तन–एकादशिनी–लघुरुद्र–महारुद्र–अतिरुद्र इत्यादींसह) हा येथला नित्याचा पूजाप्रकार असून त्यासाठीं श्रींच्या कित्येक स्थानिक व बाहेरच्या भक्त मंडळींनीं श्रींच्या भांडारांत ठराविक रकमा ठेवून प्रतिवर्षीं ठराविक दिवशीं आपापलीं देवकृत्यें व्हावीं अशी व्यवस्था केली आहे.

कित्येक भक्तांनीं प्रासंगिक उत्सवाच्या खर्चाची कायमची व्यवस्था करून ठेविली आहे.

कित्येकांनीं स्वतः चालू केलेलीं देवकृत्यें आपल्या पश्चात् आपल्या निधन–तिथीला करावीं अशी व्यवस्था करून ठेविली आहे, तर कित्येकांनीं

आपल्या पूज्य वडिलांच्या निधनतिथीनिमित्त श्रीस्थळीं अभिषेक, अन्नदान इत्यादि कृत्यें व्हावीं अशीही व्यवस्था केली आहे.

या सर्व देवकृत्यांच्या मित्या (दिवस) देवस्थानच्या टिपण-बुकांत नोंदलेल्या असून तीं तीं देवकृत्यें ठराविक मितीला होत असतात.

या देवकृत्यांपैकीं महारुद्र हा साधारणपणें दोन तीन दिवस चालतो. अतिरुद्राला त्यापेक्षां अधिक दिवस लागतात. ज्या दिवशीं महारुद्र किंवा अतिरुद्र संपूर्ण होत असेल त्या दिवशीं दुसऱ्यांची पूजा होत नाहीं.

रुद्राभिषेक

श्रीमंगेश हें शिवस्थान असल्यामुळें येथील नित्य नैमित्तिक कृत्यांत रुद्राभिषेकाला विशेष महत्त्व आहे. श्रींच्या प्रत्यक्ष पूजेच्या वेळीं पंचामृतस्नानानंतर श्रीरुद्राध्याय-पठणपूर्वक श्रीवर अभिषेक करतात. त्याचे पुढील प्रकार आहेतः—

(१) पंचामृतासह एकावर्तन (एक वेळ रुद्राध्याय म्हणणें)

(२) पंचामृतासह एकादशिनी (अकरा वेळ रुद्राध्याय म्हणणें)

(३) बेडेचा लघुरुद्र (यजमान हातांत टोंकाला गाईचें मुख बसविलेलें गव्याचें शिंग घेऊन त्यांतून अभिषेक करतात व ब्राह्मणवर्ग अभिषेकपात्र धरून रुद्र म्हणत अभिषेक करतात, त्याला ही संज्ञा आहे.

(अकरा एकादशिन्यांचा एक लघुरुद्र होतो)

(४) बेडेचा महारुद्र (वरीलप्रमाणें ११ लघुरुद्र झाले म्हणजे तो महारुद्र होतो.)

(५) शिंगाचा लघुरुद्र व महारुद्र (यजमान व ११ ब्राह्मण सगळेच गव्यांचीं शिंगें घेऊन वरीलप्रमाणें अभिषेक करतात त्यांना या संज्ञा आहेत.

[या प्रत्येक कृत्यासाठीं येणारा खर्च ठरवून दिलेला आहे; तो अगदीं बेल, फुलें इत्यादि साहित्यासह-तीं तीं कृत्यें करणाऱ्याला मिळतो.]

नैवेद्य

षोडशोपचार अगर पंचोपचार पूजेंत नैवेद्य हा एक अवश्य उपचार आहेच. म्हणून श्रींच्या पूजेंत अभिषेकानंतर वस्त्रोपवस्त्रसमर्पण व त्या पुढें

धूप-दीप दाखवून झाल्यावर ' नैवेद्य समर्पण ' हा महत्वाचा भाग असतो.

हा नैवेद्य अन्नमय असल्यास त्यास महानैवेद्य म्हणतात.

मंगेशी येथें श्रींच्या या अन्ननैवेद्याबरोबरच (१) ग्रामपुरुष यास पायस आणि (२) मूळकेश्वर यास खिचडी व त्यानंतर तंबाखूची विडी व कांबळ-कोयती अर्पण करण्याची वहिवाट आहे. त्याचप्रमाणें कालभैरव देवास वड्यांची माळ अर्पण करतात.

[कोकण प्रांतांत शिवाच्या देवस्थानांचे मुख्य पुजारी बहुधा ' गुरव ' असतात. हे मूळचे लिंगायत अथवा ' वीरशैव ' असावे. ' शिवस्व ' स्वीकारण्याचा अधिकार यांच्याशिवाय दुसऱ्याला नसतो. मंगेशी येथें श्रीमंगेशाची मुख्य पूजा ब्राह्मणच करतो. तें काम एका ब्राह्मण घराण्याकडे नेमून दिलेलें आहे. अर्थात् अन्नाचा नैवेद्यही तोच दाखवितो, पण प्रसाद म्हणून त्याचा पुनः स्वीकार मात्र तो करीत नाहीं. तो पैरेकर नोकर (हा देवदासींच्या घराण्यांतील असतो) घेऊन जातो. ग्रामपुरुष व मूळकेश्वर यांचे नैवेद्य व इतर अर्पिलेल्या वस्तूही तोच घेतो.]

अन्नसंतर्पण

कोणतेंही देवकृत्य वा काम्यकर्म अन्नसंतर्पणाशिवाय पुरें अथवा फल-दायी होत नाहीं अशी पूर्वापार समजूत असल्यामुळें अन्नसंतर्पण हें या देव-कृत्यांचें एक महत्त्वाचें अंग असतें. या संतर्पणासाठीं दहा-वीस-पंचवीस-पन्नास असे ब्राह्मण व इतर देवाश्रित मंडळी यांस यथाशक्ति भोजन घालतात. त्यावेळीं भूयसी दक्षिणा, विडे इत्यादि खर्च होत असतोच. व या कामीं राबणाऱ्या मंडळीला यथाशक्ति बिदागीही द्यावी लागते.

सोमवार

तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें ' हरिच्या दासां'ना सारा काळ व अवघ्या दिशा शुभच असल्या तरी हिंदुधर्मातील विशिष्ट देवतांसाठीं विशिष्ट दिवस विशेष शुभ व पवित्र मानले आहेत. त्याप्रमाणें श्रीसांबसदाशिवाच्या उपास-कांना सोमवार हा दिवस अतिशय पवित्र मानलेला आहे. म्हणून त्या

दिवसाचें महत्त्व मंगेशींत फार आहे.

या दिवशीं रोजच्या नियमांशिवाय सकाळीं ८ वाजतां एक तास चौघडा झडत असतो. महाजन मंडळीपैकीं कोणी देवस्थानांत कितीही दिवस असला तरी सोमवारच्या दिवशीं त्यास परत जातां येत नाहीं. एखादें मोठें महत्त्वाचें काम असेल तर श्रीपुढें नारळ ठेवून श्रीची प्रार्थना करून गेलें पाहिजे अशी वहिवाट आहे.

या दिवशीं पालखी निघते तिचीं नेमकीं १६ च पेणीं (मुक्काम) होतात. ही पालखी रात्रौ १० वाजतां निघते व ११ च्या सुमारें परत देवळांत येते. ती देवळाभोंवतीं वाटोळी फिरत नसून पाठीमागें मूळकेश्वराच्या देवळासमोर गेली म्हणजे परत फिरते व तुलसीवृंदावनास प्रदक्षिणा करून देवालयांत जाते (हिला सोमसूत्री प्रदक्षिणा असें म्हणतात.) अन्य उत्सवांच्या पालखीच्या वेळीं ही सोमसूत्राची अडचण धरीत नाहींत.

या दिवशीं (व अन्य उत्सवाचे दिवशींही) श्रींची स्वारी पालखींतून निघण्याचे पूर्वीं देवस्थानांत असलेल्या महाजन लोकांना कमाविसदार यांजकडून शिपाई पाठवून बोलावणें करतात.

या पालखीबरोबर सोन्याचा राजदंड कमिटीचे चिटणीस घेत असून चवऱ्या व मोर्चलें महाजन लोक घेत असतात.

वार्षिक उत्सव

हिंदु लोकांचे चैत्रापासून फाल्गुनापर्यंत जे सण आहेत त्या सणांच्या दिवशीं (उदा. रामनवमी, अक्षय्यतृतीया, अनंतव्रत, नवरात्र इत्यादि) सामान्यतः या देवालयांतही संस्थानातर्फे उत्सव होत असतात. कित्येक उत्सवांच्या खर्चाची व्यवस्था श्रीच्या भक्तांनींही करून ठेवलेली आहे; त्यामुळें ते ते उत्सव नियमित दिवशीं मोठ्या थाटानें होत असतात.

नैमित्तिक देवकृत्यें

धूळभेट : देवकृत्यासाठीं येणाऱ्या बाहेरच्या महाजनानें देवालयांत प्रवेश करतांच प्रथम श्रीमंगेशाचें, नंतर ग्रामपुरुष, त्यानंतर मूलकेश्वर वगैरे देव-

तांचीं अनुक्रमानें दर्शनें घेण्याची पद्धत आहे. यावेळीं श्री मंगेशास नारळ व इतरांस एक केळें अर्पण करण्याची वहिवाट आहे.

गांठवल तथा **वधूवरदंपत्यस्नान** : म्हणजे लग्न झाल्यानंतर प्रथमच सहकुटुंब देवदर्शनास येणाऱ्या महाजनाकडून देवालयापुढील तलावांत विधिपूर्वक स्नान करणें.

या गांठवलांत (१) गणपतिपूजन (२) भेट (नारळासह) (३) फलदान व (४) अभिषेक–नैवेद्य हे मुख्य विधि असतात.

घुड भरणें : म्हणजे गर्भागार पाण्यानें देवाच्या मस्तकावर पाणी पोहोंचेपर्यंत भरणें

(हें यजमान स्वतः अगर ब्राह्मणांमार्फत करूं शकतो)

तुळाभार : श्रीदेवासमोर नारळ किंवा इतर फळफळावळ, गूळ, साखर किंवा इतर धान्यें यांनीं स्वतःची ‘ तुळा ’ करून त्या पदार्थाचें दान करणें, यास तुळाभार म्हणतात.

[यांपैकीं कांहीं भाग देवाच्या भांडारांत जमा केला जातो व इतर साऱ्या आश्रितांत वांटला जातो. तांब्रें, पितळ, सोनें इत्यादि धातूंची तुला केल्यास सर्वच भांडारांत जमा करतात.

एकदारी पूजा : ही केळीच्या सोपांनीं बांधली जाते. या विशिष्ट पूजेंत अभिषेक–नैवेद्य, पूजा बांधणाऱ्यास बिदागी व इतर दक्षणा वगैरेसाठीं बराच खर्च होतो. कांहीं रक्कम श्रींच्या भांडाराकडेही घेतात.

तीनदारी पूजा : हीही वरीलप्रमाणेंच असून पूजा बांधणें, दक्षणा वगैरेंस थोडा ज्यास्त खर्च येतो.

[श्रीशांतादुर्गा]

देवकृत्यें

[१] श्रीमंगेश देवाप्रमाणेंच येथेंही तीन प्रतींचा अभिषेक, आवर्तन, एकादशिनी, लघुरुद्र, महारुद्र इत्यादि देवकृत्यें होतात.

शिवाय [१] नवचंडी [जपद्वारा] [२] नवचंडी [होमद्वारा] [३]

शतचंडी [जपद्वारा] [४] पंचिष्ट देवतांस नैवेद्य [५] अन्नसंतर्पण [ब्राह्मण-सुवासिनी कुमारिका यांसह] [६] दंपत्य स्नान [७] बारांची पूजा [८] देवालयाचा घूड पेटविणें [९] खांब पेटविणें इत्यादि देवकृत्यें होत असतात.

पूजाप्रसंगीं श्रीस सुवर्णपुष्प समर्पण करण्यांत आल्यास तें त्या पक्षांतील पहिरेकर पुजाऱ्यास मिळतें. पण अभिषेकाचे प्रसंगी सुवर्णाभिषेक म्हणून सोन्याचें नाणें, लगडी अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे अलंकार श्रीस अर्पण केल्यास ते श्रीसंस्थानीं जमा होतात)

पंचमी

श्रीमंगेशीं सोमवार तशी येथें पाक्षिक पंचमी हा महत्त्वाचा दिवस मानतात. शुद्ध व वद्य या दोन्ही पंचम्यांना शिबिकोत्सव होतो. या एकूण २४ उत्सवांपैकीं १४ उत्सवांचा खर्च संस्थानच्या भांडारांतून व १० उत्सवांचा भाविक महाजनांकडून होण्याची व्यवस्था आहे.

या दिवशीं कोणीही महाजन क्षेत्रांत असतां त्याला उत्सव पूर्ण झाल्याशिवाय क्षेत्रांतून बाहेर जातां येत नाहीं. अगदींच निरुपाय असेल तर श्रीपुढें नारळ ठेवून विनंती करून मग जातात.

या दिवशीं पुराण–कीर्तनादि झाल्यावर श्रींची पालखींतून मिरवणूक निघत असते. ही मिरवणूक निघाली म्हणजे विवक्षित ठिकाणीं रथावर नारळ फोडण्याची वहिवाट आहे. प्रथम संस्थानतर्फे,त्यानंतर श्रीकैवल्यपूर मठाधीशांतर्फे, नंतर 'बुर्यो' या उपनांवाच्या वैष्णव गृहस्थांचा, त्यानंतर कुशस्थळीकरांतर्फे व त्यानंतर इतर लोकांचे असा या नारळ फोडण्याचा क्रम आहे.

तुळाभार

हा श्रीमंगेशींतील देवस्थानांतल्याप्रमाणेंच होतो. नारळांचा व इतर खाद्य पदार्थांचा अगर तांब्या–पितळेचा असेल तर तो आश्रितांत वहिवाटीप्रमाणें वांटला जातो; पण तो सोनें, रुपें, पोवळें, मोतीं, जडजवाहीर अशा मोलवान वस्तूंचा असेल तर तो सगळा देवाच्या भांडारांत जमा होतो.

: १३ :

महाजन ऊर्फ कुळावी

देवस्थानचे जे ठराविक उपासक आहेत त्यांस ‘ महाजन ’ किंवा ‘ कुळावी ’ अशी संज्ञा असून त्यांचा क्रम असतो. या क्रमास ‘ वांगड ’ म्हणजे बरोबरचे असें म्हणतात. देवस्थानची व्यवस्था यांच्याच हातांत असते. व ती ते आपल्यापैकीं आठ इसमांचें (यांतील चार मुख्य व चार त्यांचे सहाय्यक) कार्यकारी मंडळ नियडून पाहतात. हे सारे अर्थात सारस्वत ब्राह्मण असून श्रीमंगेशाचे वत्सगोत्री १४ आणि कौंडिन्य गोत्री १० मिळून २४ आहेत. श्रीशांतादुर्गेचे कौशिक गोत्री १२ आहेत. त्यांचीं मुख्य व मागाहून बदललेलीं नांवें (उपनांवें) पुढील प्रमाणें––

[*श्रीमंगेश–महाजन*]

१ लाड–सत्यवंत (दुभाषी, सांगडेकर) व.

२ कें (खे) डारी (खेडारी) व.

३ भांडारी (भांडारे, पा (प) तावरकर) कौ.

४ सत्यवंत–भांडारी कौं.

५ दळवी-कौं.

६ राजाध्यक्ष–दळवी (उसपकर, कर्णिक, गडणीस, गुडे, देशकुळकर्णी, देशपांडे, धायमोडे, नगर्सेकर, नाडकर्णी, पावसे, पिळगांवकर, मणेर (री) कर, मये (यें) कर, मुळगांवकर. मंडुरकर, राजाध्यक्ष, रांगणेकर, सालेलकर) कौं.

७ शिंगण-दळवी (आरस, शिंग (सिंग) बाळ) व.

८ कंटक–(उसगांवकर, काकोडकर, कंटक, टाकी, साळकर) व.

९ ब्राहो–व.

१० पालेकर (आंब्रये, कायसुलकर, कोळमुळे, कोळसुले, नेर्लीकर, बस्तोडकर) कौं.

११ भिसे (आट (ठ) वणकर, पाटकर, चोंडसे) व.

१२ नेत्रावळीकर, (नेत्रावळकर) व.

१३ कैसरे (कैसरी) कौं.

१४ तिनईकर (तिनयकर) व.

१५ वागळे (अउर्सेकर, आउरशेकर, आजगांवकर, नाडकर्णी, माजळकर, वाघ, वैष्णव) कौं.

१६ तेलंग [तेलिंग, देवनळी] व.

१७ भेंडे (पागनीस) कौं.

१८ केंकरे (अडवलपालकर, आगसी (शी) कर, आंब्ये, कवडे, कोनेकर, खोत, गुंजीकर, तोरसेकर, प्रियोळकर, फडणीस, लावणी [णनी]स. व.

१९ नाईक-कोळंबे [करंडे] व.

२० नाईक-मांयकर (भाटकी, म्हाइमे, मायणकर, सराफ) कौं.

२१ धुमे (धमे) व.

२२ काब्राडी (नाडकर्णी, रेडकर) कौं.

२३ नाईक-हिंगटे (देऊलकर, हिंगोटे) व.

२४ नाईक-संजगिरी (केरकर, देशपांडे, नाडकर्णी, मोरजकर, संझगिरी, हरमलकर, हल्याळकर) व.

[श्रीशांतादुर्गा - महाजन]

(हे सर्व कौशिकगोत्री आहेत.)

१ म्हाले (शिरोडकर)

२ हरपती (पिसुर्लेकर)

३ वैद्य (कोपीकर, स्थळेकर, हवालदार)

४ सुखटणकर (कारापुरकर, कुवेलकर, कांसारकोंडकर घांटकर, निलकुंदकर, सुर्लकर, सुखठणकर)

५ भांडारी (चिन्नरकर, भांडारकर)
६ धोंदे
७ रामाणी (रामायणी देसाई)
८ श्रीधर पै (पुनरेकर)
९ रेगे (असोलडेकर, कुडचरकर, कुळकर्णी, कोटंबकर, खोलकर, झणकर, तलावडकर, नाडकर्णी, बक्षी, मंत्री, मलकर्णेकर, वाळडीकर, शिरवईकर, शेळडेकर, सांवर्डेकर, साळावलीकर, सुर्लेकर, सांकोर्डेकर, होडरकर)
१० शिंसाणी (कुंडईकर)
११ गायतोंडे (उसकईकर, कसवेकर, कुळकर्णी, दाभोळकर, बरडे, हेदे)
१२ साखरदांडे (कुळकर्णी, नारिंग्रेकर)

[यांशिवाय वत्सगोत्री वर्दे, भारद्वाजगोत्री पाणंदीकर, वासिष्ठगोत्री साळशीकर हेही या देवीचे भजक आहेत. तथापि त्यांचा ' वांगडां ' त समावेश नाहीं. यांपैकीं पाणंदीकरांच्या मूळ पुरुषाची प्रतिमा कवळें येथें पांडुरंग जोशी यांच्या घरीं अद्यापि पहावयास मिळते. 'वर्दे ' यांचें मूळ उपास्य दैवत श्रीगणपति असावें; तें पूर्वी 'वेळा' गांवीं होतें. हल्लीं 'अंत्रुजीं'-तील 'खंडोळें ' गांवीं आहे.]

: १४ :

झुलवे

श्रीमंगेशीं श्रींच्या देवालयाभोंवती पालखी फिरतांना नृत्यांगनांचें गायन चालतें. या गायनाच्या प्रारंभीं प्रत्येक पेण्याच्या वेळीं 'झुलवे' नांवाचीं गाणीं म्हणतात. तीं श्रीनाईक स्वामी या साक्षत्कारी पुरुषानें रचलेलीं आहेत तीं येणेंप्रमाणें :—

(१)

हरहर मंगेश्वर तनुकुशपुरनाथा ।
हर विश्वंभर सुखदाता ॥

हरहर तापत्रय भवछेत्ता ।
हरहर गाइन शिविकोत्सव गुणनाथा ॥

(२)

प्रथम पदांगुष्टाधर अग्नी ।
ध्याता तेजोमय स्वप्रभाव नेत्री ॥
दृश्य–द्रष्टा–दर्शन त्रिपुटी सूत्री ।
दृष्टी स्थिरता पावे चित्रविचित्री ॥

(३)

तृतीय साधन मूलाधार सूत्र ।
विमर्श पृष्टीं नाडीं पीडन तंत्र ॥
करितां स्वच्छासन होउनियां तंत्र ।
काळ अग्नि संदीपन वोप विचित्र ॥

(४)

चतुर्थ मेढ्राधारी लिंगस्थान ।
संकोचनविद ग्रंथीत्रय भेदोन ॥
रुद्रमुखीं ब्रिंदूचें स्थान ।
होतां भ्रमरित गुंफे समाधान ॥

(५)

पंचम वोढाने, वृत्तिनिरोध ।
अपमान वुछ रंगी होउनि निजशब्द ॥
समान योगी प्राण्यासी समाधान ।
होतां संजीवन लाभे योग्य बोध ॥

(६)

षष्ठम नाभ्याधारी एक चित्र ।
प्रणवोच्चारण करितां सद्‌गुरु उक्त ॥

नादनिनादीं होउनि अत्यद्भुत ।
सहजी समाधी लाभे अनाहत ॥

(७)

सप्तम हृदयाधारीं मुख्य प्राण ।
निरोध करितां लाभे सुख संपूर्ण ॥
हृदयपंकज होउनि विकाशमान ।
सहजीं सहज पूर्ण समाधान ॥

(८)

अष्टमधारी चिबुकनिरोध ।
करितां रविशशि नाडी होउनि स्तब्ध ॥
चंद्रामृतद्रव स्रवे परमानंद ।
होतां सहजीं लाभे योग्य बोध ॥

(९)

नवम स्थानातें घटिकाधार ।
तेथें गुरूक्त क्रम अत्यंत सार ॥
विपरित जीवा परोक्षी एकाग्र ।
अमृत करितां प्रीत होते शरीर ॥

(१०)

दशम तत्व नत रत्नंचिका स्थान ।
तेथें दीर्घकृत दोहन चालेन ॥
विपरित युक्ती रंध्रीं प्रवेशून ।
करितां निर्विकल्प समाधान ॥

(११)

आतां एकादशिं-तो जीवाधार ।
गुरूक्त तंत्र धरि जेथें तदाग्र ॥

सर्वेही रोगांचा होउनि संहार ।
शीतल चंद्र मग होतें शरीर ॥

(१२)

द्वादशीं आधारता भ्रुवोमध्यें ।
तेथें ध्याता चंद्रमंडळ शुभ्र ॥
नयनीं विकासे तुष्टय होउनि शब्द ।
शांतशीतल लाभे स्वरूपबोध ॥

(१३)

आतां त्रयोदशीं तो नाशाधार ।
रंध्राक्षी मानस वृत्तीसार ॥
होउनि लाभे रूप साक्षात्कार ।
जैसा लोपे प्रकाश अंधःकार ॥

(१४)

आतां चतुर्दशीं तो नाशामुलक वाटे ।
तेथें लक्षीं धरितां निजात्म भेटे ॥
जल्मासादि तेजोमय दृष्टी ।
होतां संजिवन लाभे निजात्म भेटे ॥

(१५)

आतां पंचदशीं तो ललाटाधार ।
तेथें सलाभजोति पुज्याकार ॥
लक्षीं धरितां स्वरूपसाक्षात्कार ।
जैसा लोपे प्रकाश अंधःकार

(१६)

अवस्रष्टाते ब्रह्मारंध्रशेष ।
करुणा, चकुभ, गुरुपाद रक्ष ॥

धरितां परशिव तत्वय शेषारक्ष।
पूर्ण झाला श्रीमंगेशीं मंगेश ॥

१५ मंगलाष्टकें

(श्रीमंगेशीं पालखीच्या वेळीं म्हणण्यासाठीं)

[हीं श्री विश्वनाथ पांडुरंग शेणवी हेदे यांनीं रचलेलीं आहेत.]

श्रीमन्मांगिरिशा पुराणपुरुषा देवा भवानीवरा ॥
नंदीकेश शिवा अघौघहरणा श्रीविश्वरूपा हरा ॥
विश्वातीत गुणत्रया विरहिता कर्पूरकुंदामला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना श्रीमांगिरीशा मला ॥ १ ॥

तूं सर्वांतहि श्रेष्ठ देव म्हणुनी वेदज्ञ ते बोलती ॥
तूं कैवल्यरुपी विराटस्वरुपी शास्त्रें अशीं गर्जती ॥
ऐसा तूं जगरक्षिता भुवरि या लिंगाकृती राहिला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना श्रीमांगिरीशा मला ॥ २ ॥

भक्ता आधिन तूं सदा पशुपती भक्तीस तूं भाळसी ॥
भक्ती तुष्टुनियां तदा दशशिरा लिंगा स्वयें अर्पिसी ॥
तोची तूं भुवरी नटूनि सजुनी उद्धारिसी त्वत्कुला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ० ॥ ३ ॥

जेव्हां दैत्य सुरीं समुद्र मथितां वीषाग्नि तो पेटला ॥
त्या वेळीं भुवनीं अशा विषभयें आक्रांत तो वाटला ॥
ऐशा संकटिं धांव पाव म्हणतां जो कां तयां पावला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ० ॥ ४ ॥

ऐशा संकटिं बा तुलाचि स्मरतां, तूंही त्वरें धांवसी ॥
जें जाळी विष तें अखील भुवना, देवा स्वयें प्राशिसी ॥
तेव्हांपासुनि नीलकंठ म्हणती सर्वेश्वरा तूजला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ० ॥ ५ ॥

शक्ती आधिन तूं असें म्हणुनियां शास्त्रें प्रतीपादिती ॥
तीच्या वांचुनि तूजलाहि न गमे तूझ्या रुपीं लीन ती ॥
याचा हा उघडा नव्हे उलगडा जाणे तुंची हे लिला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ० ॥ ६ ॥

जो निर्मी जगती विधी म्हणति ज्या त्याही रुपा घेसि तूं ॥
पाळाया त्रिजगा म्हणूनि नटसी विष्णुस्वरूपेंहि तूं ॥
अंतीं तूं प्रळयींच रुद्रस्वरुपें संहारिसी या भुला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ० ॥ ७ ॥

ज्यावेळीं तुजला द्युतांत हरिलें खेळूनियां गौरिनें ॥
तेव्हां त्यागुनियां सुरम्य नग तो तूं हिंडसी काननें ॥
भक्तांच्या स्मरणा करूनि करुणा आलासि तूं भूतला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ० ॥ ८ ॥

चिच्छक्ती प्रणवस्वरूपिणि शिवा जी चित्कला आपुली ॥
रामक्षेत्रिं बघूनियां तुज तिथें येओनियां राहिली ॥
दोन्ही एक तुम्ही परंतु न कळे कोणासही ती लिला ॥
त्राहि त्राहि विभो अनंगदहना ०॥ ९ ॥

श्रीरामेश्वरिंहूनियां प्रभुवरा गोमांतकीं येउनी ॥
जेथें तूं वससी सुरम्य स्थळ तें लोकोद्धरा लागुनी ॥
गोवें त्या म्हणती ऋषीजन बहू त्या सुस्थळीं वर्तती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं बा पाव सर्वांप्रती ॥ १० ॥

तेव्हां सप्तऋषी मिळोनि तपती प्राप्ती तुझी व्हावया ॥
भक्ती पाहुनियां तुंही प्रगटसी भक्तांसि तारावया ॥
तेथें स्थापुनि सप्तकोटि-इश तो पाळीसि भक्तांप्रती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं बा पाव सर्वांप्रती ०॥ ११ ॥

नाना वृक्ष तिथें सदैव फलती कूपोदकें वाहती ॥
तेथें येउनियां असंख्य द्विज ते धर्मी सदा वागती ॥
अग्नीहोत्रि तसेच पूज्य असुनी भावें तुला सेविती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १२ ॥

कोणी एक दिनीं सुचंद्रग्रहणीं लोमेश तो जीवनीं ॥
कर्में आटपुनी द्विजां सुखवुनी स्नानानिमित्यें क्षणीं ॥
न्हातां जीवनिं नक्र जाउनि धरी त्या लोमशर्म्याप्रती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १३ ॥

ऐशा संकटिं कंशगोत्र मुनिनें देवा तुला प्रार्थिलें ॥
तेव्हां पाहुनियां सुभक्ति मुनिची, त्वां दर्शना दीधलें ॥
त्या वेळीं स्परुपा विलोकुनि मुनी धाकें बाहू कांपती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १४ ॥

देवा होउनियां दयार्द्र मग तूं मागें म्हणे रे क्षणी ॥
तेव्हां लोम म्हणे तुझें भजन दे माझ्या कुळा लागुनी ॥
चिच्छक्तीसह तूं इथेंच असुनी रक्षीं स्वभक्तांप्रती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १५ ॥

होसी गुप्त असा अभीष्ट वर त्या देऊनियां चांगला ॥
तेव्हां लोममुनी बहूत हरिखें तो आश्रमीं पातला ॥
झालें वृत्त जसें ऋषींस कथितां सौख्या बहू भाविती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १६ ॥

शक्ती जी प्रमदा तुझी मग तदा शोधी तुला त्या स्थळीं ॥
तेव्हां व्याघ्ररुपा धरूनि मग त्वां भेटी तिला दीधली ॥
त्राही मांगिरिशा म्हणूनि वदली ती संकटीं पार्वती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १७ ॥

दोघें तुम्हि कुशस्थळीं नदितिरीं भिन्नगृहीं राहिलां ॥
तेव्हां लोम मुनी वनांत फिरतां कर्णीं ध्वनी ऐकिला ॥
रे रे मी तुजला प्रसन्न जाहलें वाढेल त्वत्संतती ॥
शंभो शंकर शक्तिरूप शिव तूं ० ॥ १८ ॥

झालें मी स्थलिं शांत या म्हणुनियां मन्मूर्ति तूतें मुनी ॥
शांता नाम जिला असें म्हणति ती लाधेल या काननीं ॥
तूतें पुत्रकुलें बहूत निपजो नांदो सुकीर्ती रवी ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों कुला तुझ्या नांदवीं ॥ १९ ॥

विप्रा ऐक कुशस्थळीं तुज पुढें मांगीश हे भेटती ॥
केळोशींत असेन मी समजुनी पूजा करीं निश्चितीं ॥
ऐसें सांगुनियां सुगुप्त मग ती झाली सदा शांभवी ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों कुला ० ॥ २० ॥

गोत्रें वत्स कुशस्थळांत मग ये तो देवशर्मा जसा ॥
तों तेथें शिवशर्मनामकहि ये कौंडिण्यगोत्री तसा ॥
ऐक्यें तेथचि राहिले उभयतां भक्ती करोनी भवीं ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों कुला ० ॥ २१ ॥

स्नानीं एकदिनीं कुशस्थळिपुरीं तो देवशर्मा मुनी ॥
धेनू शुभ्र सुरम्य पीन तनु ही पाहे तदा लोचनीं ॥
धेनू जाउनियां जलीं मग फिरे ऐसी कृती दाखवी ॥
भोला शंकर पार्वतीसह नमो० ॥ २२ ॥

ऐसें चोज बघोनि पुच्छ धरुनी गेला तिच्या संगती ॥
तों तेथें शिवपार्वती उभयतां सिंहासनीं शोभती ॥
तेथींचें बहु तेज तें वदुं किती कोटी उदेले रवी ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों ० ॥ २३ ॥

तेव्हां तूं वदसी प्रसन्न वदनें त्या ब्राह्मणालागुनी ॥
मी लिंगस्वरुपें कुशस्थळिं असें मांगीश नामें जनीं ॥
केळोशींत वसेल शक्ति मम ती पापौघ जी घालवी ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों ० ॥ २४ ॥

देवा तेचिहि लिंगरूप विभुती पिर्योळिं या साजली ॥
साक्षात् पार्वति शांत रूप धरूनी कैवाल्यिं ती राहिली ॥
दोघेंही प्रकृती-पुरूष मिळुनी तारा जना या भवीं ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों० ॥ २५ ॥

त्वन्नामेंच स्थल प्रसिद्ध जाहलें मंगेशि त्या बोलती ॥
तेथींची महिमा मला न वदवे वेद ध्वनी गर्जती ॥
पाहोनी रचना स्थलाचि सुजना आनंद संतोषवी ॥
भोला शंकर पार्वतीसह नमों० ॥ २६ ॥

ऐसें स्तोत्र तुझें सदांच पढती देसी तयां संतती ॥
संपत्ती सुत वैभवादि अवघे शेखींहि ती सद्गती ॥
पांडूपुत्र म्हणे दरिद्रदुरिता देशांतरा पाठवीं ॥
भोला शंकर पार्वतीसह नमो कूला तुझ्या नांदवीं ॥ २७ ॥

★

: १६ :

आरत्या, पदें, इ.

आरत्या

(१)

[श्री. वामन मंगेश दुभाषीकृत]

जयदेव जयदेव यय जय मंगेशा । सुखदात्या कुलदेवा जय मांगिरीशा ॥ धृ ॥
प्रेमळ लोमशर्मा भक्तांचा त्राता । सन्मुख श्रीपुरुषोत्तम बहुभाग्यदाता ॥ १ ॥
सन्निध्यीं शिवशर्मा संसारीं नेता । स्वकुलास्तव गोमांतकिं वससी भवनाथा ॥
शांतादुर्गा पाळी पोषी भक्तांना । महालक्ष्मी मातेपरि सांभाळी त्यांना ॥
सदया महालसाही रक्षी सकलांना । दिव्य अशा शक्ती या प्रगटल्या नाना ॥२॥
वैराग्या आनंदा ठाव तुझ्या ठायीं । निवृत्तिप्रवृत्ति लोळति तव पायीं ॥
रुद्रस्वरूप शिवमय शंकर सुखदायी । प्रगटुनिया भक्तांतें पावसि लवलाही ॥३॥
मुलकेश्वर संकष्टीं धांवत ये वेगें । साह्य करी भक्तां जे पिडिले भवरोगें ॥
भक्तांस्तव रात्रंदिन प्रेमभरें जागे । नित्य करी संरक्षण राहुनियां मागें ॥४॥
जयजय महालसे श्रीमहालक्ष्मी माते । जय पुरुषा शिवशर्मा जय देवी शांते ॥
जय जय लोमशर्मा जय दे आम्हांतें । मुलकेश्वर मंगेशा रक्षीं बाळां तें ॥५॥
सारस्वत कुलवर्धक संरक्षक देवा । बाळावरि करुणाघन प्रेमें वर्षावा ॥
प्रपंच परमार्थाचा लाभ तया व्हावा । अर्पी वामन पायीं निष्काम सेवा ॥६॥

(२)

जय हर हर शिव हरहर मुरहर मनहरणा ।
सुरवरनरउरगादिक स्मरती तव चरणां ।। धृ ।।
ब्रह्मेंद्रादि मुनींद्रहि रत निशिदिनिं स्मरणीं ।
स्मररिपु तूं स्मरतां तुज स्थापिसि निजचरणीं ।।
स्मशानवासी त्वत्पद सेवुनि निर्वाणीं ।
भवभ्रमभ्रांती सकळहि निरसिलि गीर्वाणीं ।। १ ।।
शुद्धब्रह्म निरंजन निर्गुण तव मूर्ती ।
वेदांतार्थ समुद्‌भव ज्योतिर्मय स्फूर्ती
दुर्लभ बहु निर्मल तव पदपंकज कीर्ती ।।
निजजनभजनीं रमसी अनुदिन सर्वार्थी ।। २ ।।
आगमनिगमां अगम्य तूं कर्पुरगौरा ।
त्रिभुवनजननी वधू तव त्रिपुरांतकवीरा ।।
त्रिपुरासुर भस्मासुर रिपु जगदाधारा ।
विठ्ठलहृन्नभवासी शशांकसुखसारा ।। ३ ।।

जय हर हर०

पदें

(१)

दीनानाथा दीनदयाळा करुणाकर स्वामी ।
हर-हर शब्दें हर्ष होतसे शंभो तव नामीं ।। धृ ।
नंदीवाहना, गिरिजारमणा भाललोचना जगत्पती ।
पंचवदना पुराणपुरुषा केंवि वर्णु मी मंदमती ।। २ ।।
भक्तवत्सला विश्वव्यापका सुहास्यवदना जगत्प्रभो ।
मूढमती मी शरण येतसें पाव सत्वरीं अगा विभो ।। ३ ।।
कर्पुरगौरा भस्मलेपना भक्तवत्सला उमापते ।
रक्षिं रक्षिं बा तव दासातें भयहारक तूं विश्वपते ।। ४ ।।

पंचवदना कलिमलदहना स्थितिलयकर्त्या अगोचरा।
हर हर शिव शिव मंत्रहि सोपा तारक होई चराचरा ॥ ५ ॥
दीनरक्षका, जगदाधारा, सचितानंदा जगद्गुरो।
मंगेशात्मज प्रार्थी तुजला भवसागर हा तरो ॥ ६ ॥

–स. मं. दुभाषी

(२)

त्रिहोत्रपुरिंची श्रीजगदंबा कर्दलिपुरवासिनी। जाहली जी सुखदा निज जनीं ॥धृ॥
दुर्जनवर्गा दरदा दुर्गा जी क्रुद्धा हरिहरां। शांतवी शांता भयभयहरा ॥
कालगतीच्या व्याजें करुनी दावी स्थानांतरा। परि न जी सोडी भक्तांतरा ॥
जीचे पदसारसरज दुर्लभ इंद्रादिक सुरवरां। भाविक पात्र जियेच्या वरा ॥
वदति जियेच्या कृपें पंगुही उल्लंघितिहिमधरा। फिराया त्यां न पुरे ही धरा ॥
सौम्यरूप त्या सदय जननिचें लाजवि अमृतकरा। विबुध नर जीस जोडिती करा॥
शोधी औत्सुक्यें जी हंसी सज्जनमानससरा। जियेचा दीन जनां आसरा ॥
जी प्रणवरूपिणी जगताची माता। यन्नामोच्चारण मुक्त करी पतितां।
जी दीनजनांची निरुपम कल्पलता। जी रक्षी सुजनां त्रस्तमनां प्रणतां।
ती श्रीशांता कैवल्यपुरीं विष्णुप्रिय जननी। राहे जी सुखदा निजजनीं ॥१॥

[-शेळडेकर]

श्रीशांता सुखदा म्हणोनि मनुजा शांतेस ध्याई सदा।
शांतेनें शिवविष्णुला शमविलें वारूनि विश्वापदा ॥
शांतेला नमना करूं विषयही चिंतू न शांतेहुनी।
शांतेचा स्तव गी करो मन रमो शांतेंत शांते क्षणी ॥ १ ॥

(—शेळडेकर)

१७ स्तोत्रें

(१)

श्रीशिवस्तोत्र

[हें श्रीमांगीशमहात्म्यांतर्गत स्तोत्र नित्य पठनीय आहे]

विश्वेश विश्वजनन स्थितिभंग हेतो। विश्वेशवंद्य शिव शाश्वत विश्वरूप।

विश्वस्तकाम भवभीतिनिवर्तकेश । गंगाधरैकक्रणाकर पुण्यमूर्ते ॥ १ ॥
शंभो शशांककृतशेखर पुण्यमूर्ते । गंगाधरामरावरार्चितपादपद्म ।
नागेंद्रभूषण नगेंद्रनिकेतनेश । भक्तार्तिहन् सुरगुरो गिरिजाविहार ॥ २ ॥
श्रीविश्वनाथ करुणाकर शूलपाणे । भूतेश भर्गभुवनश्रुतिभूतगीत ॥
मायाविरोध मदनांतक विश्वमूर्ते । गौरीश गोद्विजसुरार्ति हरावतार ॥३॥
(इति श्रीमांगीश महात्म्ये श्रीशिवस्तोत्रम् संपूर्णम् ॥ श्रीशंकरार्पणमस्तु ॥)

(२)

श्री देवीस्तोत्र

(श्री शंकराचार्यकृत)

न मंत्रं नो यंत्रं तदपिच न जाने स्तुतिमते ।
न चाव्हानं ध्यानं तदपिच न जाने स्तुति कथाः ॥
न जाने मुद्रास्ते तदपिच न जाने विलपनं ।
परं जाने मातस्त्वदनुसरणं क्लेशहरणम् ॥
विधेरज्ञानेन द्रविणविरहेणालसतया ।
विधेयाशक्यत्वात्तवचरणयोर्याच्युतिरभूत् ॥
तदेतत् क्षंतव्यं जननि सकलोद्धारिणि शिवे ।
कुपुत्रोजायेत क्वचिद पि कुमाताान भवति २ ॥
पृथिव्यां पुत्रास्ते जननि बहवः संति सरलाः ।
परं तेषां मध्ये विरल तरलो ऽ हं तव सुतः ॥
मदीयोयं त्यागः समुचितमिदं नो तव शिवे ।
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥३॥
जगन्मातमतस्तव चरणसेवा न रचिता ।
न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तवमथा ॥
तथापि त्वं स्नेहं मयि निरुपमं यत् प्रकुरुषे ।
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥४॥
परित्यक्त्वा देवान् विविधविधसेवाकुलतया ।
मथा पंचाशीतेरधिकमपनीते तु वयसि ॥

इदानीं चेन्मातस्तव यदि कृपा नापि भविता।
निरालंबो लंबोदरजननि कं यामि शरणम् ॥ ५ ॥
श्वपाको जल्पाको भवति मधुपाकोपमगिरा।
निरातंकोरंको विहरति चिरं कोटिकनकैः ॥
तवापर्णे कर्णे विशति मनुवर्णे फलमिदं।
जनः को जानीते जननि जपनीयं जपविधौ ॥ ६ ॥
चिताभस्मालेपो गरलमशनं दिक्पटधरो।
जटाधारी कंठे भुजगपतिहारी पशुपतिः ॥
कपाली भूतेशो भजति जगदीशैक पदवीं।
भवानित्वत्पाणिग्रहण परिपाटी फलभिदम् ॥ ७ ॥
नमोक्षस्याकांक्षा नच विभववांछापिच न मे।
न विज्ञानापेक्षा शशिमुखि सुखेच्छापि न पुनः ॥
अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै।
मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपतः ॥ ८ ॥
नाराधितासि विधिना विविधोपचारैः।
किं रूक्ष चिंतनपरैर्न कृतं वचोभिः ॥
श्यामे त्वमेव यदि किंचन मय्यनाथे।
धत्से कृपामुचितमंब परं तवैव ॥ ९ ॥
आपत्सुमग्नः स्मरणं त्वदीयं।
करोमि दुर्गे करुणार्णवेशि ॥
नैतच्छठत्वं मम भावयेथाः।
क्षुधा तृषार्ता जननीं स्मरंति ॥ १० ॥
जगदंब विचित्रमत्र किं परिपूर्णा करुणाऽस्तिचेन्मयि।
अपराधपरं परावृतं नहि माता समुपेक्षते सुतम् ॥ ११ ॥
मत्समः पातकी नास्ति पापघ्नी त्वत्समा नहि।
एवं ज्ञात्वा महादेवि यथायोग्यं तथा कुरु ॥ १२ ॥
(इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमच्छंकराचार्यविरचितं
देव्यपराधक्षमापनस्तोत्रं संपूर्णम् ॥)
श्री देवी प्रीयताम् ॥

: १८ :

संकीर्ण

१ धर्मगुरूंचा बहुमान

सारस्वत ब्राह्मणांचे धर्मगुरु अथवा शंकराचार्य यांची गादी श्री कवळें येथें आहे. हा मठ आद्य श्री शंकराचार्यांच्या परंपरेंतील आहे.

यांची स्वारी श्री मंगेश देवस्थानच्या मुख्य यात्रेस म्हणजे माघी पौर्णिमेस देवस्थानांत अवश्य येत असते. त्या वेळीं किंवा संचारोद्देशानें वगैरे बाहेर निघाल्या वेळीं श्री मंगेशीं आगमन झाल्यास देवस्थानांत असलेल्या सर्व महाजन मंडळीनें देवाच्या एकंदर लवाजम्यासह सामोरें जाऊन त्यांना सत्कारपूर्वक देवस्थानांत आणण्यांत येतें व स्वारीचा मुक्काम स्थलमजकुरीं असतां उत्सवप्रसंगीं त्यांच्या मुक्कामीं वाद्यें, मशाल वगैरे पाठवून स्वारीस घेऊन येण्याची वहिवाट आहे.

२ स्पृहणीय मैत्री

श्री मंगेश व कवळें या दोन्ही देवस्थानांचे महाजन परस्परांस अग्रेसरत्वाचा मान देतात. म्हणजे कोणत्याही देवस्थानांतील श्रींची स्वारी रथारूढ झालेल्या यात्रोत्सवांत रथावर नारळ फोडणें, चौकावर मानाचे विडे वांटणें इत्यादि बाबतींत श्री मंगेशीं कवळेंच्या महाजन मंडळीस प्रथम मान देण्याची वहिवाट आहे. त्याच प्रमाणें मुक्तद्वार असलेल्या दिवशींही परस्परस्थानांतील पुराणिक–हरिदास यांस पहिल्यानें पुराण–कीर्तनाचा मान दिला जातो.

ही एकमेकांच्या महाजनांस अग्रमान देण्याची वहिवाट फार जुनी आहे. तिचें मूळ असें सांगतात कीं पूर्वीं एकदां सासष्टी प्रांतांतील ' मडगांवकर ' आणि ' कुडथळीकर ' यांच्यामध्यें मानपानासंबंधानें वितुष्ट आलें असतां ' कुडथळीकरांनी ' केळोशीकरांची मदत घेऊन मडगांवकरांचा पाडाव केला.

त्या वेळीं या उभयतांमध्यें झालेली मैत्री उभयतांच्या कुलदेवतांसमक्ष दृढ करण्यांत आली होती. पुढें हे दोघेही आपले जुने गांव सोडून अंत्रुज प्रांतांत येऊन राहिले तरी ही मैत्री कमी झाली नाहीं.उलट समान संकटामुळें वाढतच गेली. त्या मैत्रीचें हें प्रत्यक्ष स्वरूप आहे.

३ उल्लेखनीय कृतज्ञता

श्रीमंगेश देवस्थानच्या आवारांत श्रींच्या मुख्य प्रतीकाजवळच कुशस्थ-ळीकर वत्सगोत्री देवशर्म्याची प्रतिमा व कौंडिन्य गोत्री शिवशर्म्याची प्रतिमा देवालयाच्या बाहेर पण प्राकाराच्या आंत स्थापिलेल्या आहेत, त्याबरोबरच श्रीच्या मूळ कुशस्थळी या ठिकाणच्या श्रीच्या एका 'गावडा' भक्ताची-ज्यानें श्रीच्या स्थलांतराच्यावेळीं कुशस्थळी-करांना महत्वाचें सहाय्य केलें असलें पाहिजे त्याचीहीं-प्रतिमा देवस्थानच्या आवारांतच बसविलेली आहे. आणि या उभयगोत्री श्रींचें कुळावे आपल्या देवकृत्याचे वेळीं या गावड्याचें स्मरण म्हणून एका गावडा दांपत्याला ब्राह्म-णांच्या बरोबरीनें जेवण घालून त्याला ब्राह्मणांच्या बरोबरीचा मान देतात. हें त्यांचें कृत्य कृतज्ञतेचें उदाहरण म्हणून उल्लेखनीय आहे.

श्रीशांतादुर्गेच्या केळोशीकर कौशिक गोत्री कुळाव्यांनीही तत्कालीन आपल्या उपकारकर्त्याचें स्मरण एका वेगळ्या प्रकारें करण्याचा रिवाज कायम ठेवला आहे तो प्रकार असा :—

तत्कालीन श्रीच्या सारस्वत ब्राह्मण महाजनांनीं आपलें कुलदैवत मूळ स्थानांतून उचलून अंत्रुज प्रांतांत आणलें तेव्हां त्यांना प्रथमच जो आश्रय मिळाला तो कवळ्याच्या त्या वेळच्या महारवाड्यांत. त्या महारवाड्यांतील महारांनीं (आतां हरिजनांनीं) श्रींच्या सोईसाठीं आपली वस्तीहि नंतर तिथून उठवून दूर नेली आणि या उपकारांबद्दल त्यांनीं पारितोषिक काय मागितलें! तर वर्षांतून एक दिवस हक्कानें देवाचें दर्शन घेण्याचा अधिकार !

आज या देवस्थानचें वैभव अतिशय वाढलें आहे.तथापि तत्कालीन श्रीच्या सारस्वत ब्राह्मण महाजनांनीं तत्कालीन महारांची ही जी अट त्यावेळीं मान्य केली ती अद्यापि पाळली जाते.

दरसाल माघमासांत कवळ्याला मोठी यात्रा भरते. त्या उत्सवाच्या

शेवटच्या दिवशीं माघ शु. ॥६ रोजीं संध्याकाळीं महार लोक मंदिरप्रवेश करतात व मोठ्या भक्तीनें श्रीचें दर्शन घेऊन जातात. त्यावेळीं त्यांना तळी [तांदूळ-नारळ-खण व कांहीं पैसे घातलेली परडी] व श्रीच्या नवसांतील एक लुगडें देऊन त्यांचा सन्मान करतात.


४ एका जुन्या पत्राचा नमुना

[पेशवेकालीन गोमंतकीय सारस्वत ब्राह्मणांचें श्री शाहूच्या व पेशव्यांच्या दरबारांत चांगलेंच वजन होतें. श्री मंगेश व शांतादुर्गा या दोन्ही देवस्थानांना त्याचप्रमाणें गोमंतकांतील इतरही कांहीं देवस्थानांना इनामें मिळालीं तीं त्यांच्याच वजनामुळें हें महशूर आहे. तत्कालीन एका पत्रांतील उतारा पुढें दिला आहे, त्यावरून या उभयतांचे संबंध किती आपुलकीचे होते हें कळून येईल]

" अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो चिमणाजी गोसावी यांसीः–

सेवक चिमणाजी बल्लाळ नमस्कार सु॥ आर्बेन मया अलफ (इ. स. १७३९) मौजे कवळें मामले फोंडें हा गांव श्री यांस इनाम देऊन चिरंजीव राजेश्री नानांनीं (बाजीरावांचे जेष्ठ चिरंजीव बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब) पत्रें सादर केलीं त्याप्रमाणें तुम्हीं चालवीत नाहीं म्हणून विदित जाहलें. ऐशास राजेश्री नारबाबा (नारो राम मंत्री) यांणीं देवीस इनाम गांव मागितला. चिरजीवांनीं देवीस गांव देऊन सनद दिल्ही असतां तुम्हीं न चालवावें हा कोण विचार ? हाली हें पत्र सादर केलें असे. तरी नानांनीं सनद दिली आहे त्याप्रमाणें गांव श्रीकडे बीकुसूर चालविणे जाणिजे छ २७ साबान. "

[या पत्रावरून पेशव्यांच्या घराण्यांतील तत्कालीन एकजुटीचाहि बोध होतो. बाजीरावसाहेब मोहिमेवर असतां त्यांचे नांवें कारभार त्यांचे ज्येष्ठ पुत्र नानासाहेब चालवीत व चिमणाजी आप्पा हे त्यांचे चुलते त्यांची हरएक प्रकारें साथ करीत, म्हणूनच त्यांना त्यावेळीं दिग्विजय करतां आला. सन १७६० मधलें श्री. रघुनाथरावदादा यांचेंहि अशाच प्रकारचें एक पत्र उपलब्ध आहे.]



श्रीमूलकेश्वर



श्रीदेवी

१९ विशेष माहिती

१ दक्षिणचें नंदनवन

पुराणांतील वर्णन–'सूत संहितेंत' या प्रदेशाचें वर्णन करतांना "गोकर्णा दुत्तरे भागे सप्त योजन विस्तृतम् । तत्र गोवापुरी नाम नगरी पापनाशिनी ॥ गोवापुर्या दर्शनेन पापं हरति पुरार्जितम् । गोवापुर्याः समानंच नास्तिक्षेत्रं न संशयः" असें म्हटलें आहे. शिलालेखांत व ताम्रपटांत याचा उल्लेख 'गोपत्तन' 'गोपकपट्टम' 'गोपकपुरी' इत्यादि नांवांनीं आढळतो. महाभारतांत 'गोपराष्ट्र' म्हटलें आहे तें हेंच असावें असा पुष्कळांचा तर्क आहे. 'गोमंत' पर्वत 'गोमांचल' इत्यादि नांवांवरून सध्याचें 'गोवा' किंवा 'गोवें' हें नांव पडलें असेंही कित्येकांचें म्हणणें आहे.

४ गोमंतकांतील सा. ब्राह्मण

'त्रिहोत्र' म्हणजे सध्यांचें 'तिरहुत' होय असें मानतात. पण दुसऱ्या कित्येकांचे मतें गंगा व हिमालय यांमधील प्रदेशाचेंच तें प्राचीन नांव होतें. या प्रदेशाचा विस्तार २४ योजनें होता आणि कौशिकी व गंडकी ह्या नद्या त्याच्या सीमेवर होत्या. "जनकवंशी राजे मिथिला नगर वसवीपर्यंत या त्रिहोत्र देशांतच राज्य करीत होते."

(—बृ. वि. पुराण मिथिला खंड)

सारस्वतांची दक्षिणेकडील वसाहत–एकदम झालेली नाहीं. प्राचीन आर्यांच्या भारतांतील आगमनाप्रमाणेंच औत्तरीय सारस्वत दक्षिणेकडे सामूहिक रीत्या निदान दोन वेळां तरी आले असावे असें पुराणें नि दंतकथा यांवरून दिसून येतें. कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर म्हणतातः—

"जर दाशरथी रामचंद्राच्या वेळीं दंडकारण्यांत कोठें कोठें ऋषींचे आश्रम होते, तर त्याच्याचपूर्वी पांचपन्नास वर्षें परशुराम; तेव्हां परशुरामाच्या वेळेस पांच दहा सारस्वत ऋषी दक्षिणेमध्यें गोमंतकांत आले असले तर त्यांत असंभाव्य तें काय?....

युधिष्ठिराचा आजा भीष्म, भीष्माचा गुरु परशुराम, फार लांबची गोष्ट नाहीं (युधिष्ठिर शकाप्रमाणें पांच हजार वर्षांच्या आंत बाहेरची). तेव्हां दहावीस ऋषींपासून पांच सहा हजार वर्षांत लक्ष–दीड लक्ष सारस्वत ब्राह्मण झाले तर ही संख्या लहान नाहीं व यांत असंभाव्यही कांहीं नाहीं...आतां सारस्वतांची दुसरी जी मंडळी आली ती अलीकडे...या दुसऱ्या मंडळीला कनिष्ठपक्षीं हजार वर्षे तरी होऊन गेलीं हें खचित आहे. अधिक झालीं असतील, पण कमी नाहींत."

कोंकणांत नि गोमंतकांतही 'कदंब' राजांची राजवट कांहीं वर्षें चालली होती. या वंशाच्या राजनामांत 'देवशर्मा', 'शास्तादेव' इत्यादि नांवें आढळतात. त्यावरून हे ब्राह्मण असावे असें वाटतें आणि हे राजे प्राचीन आर्यधर्माचे कट्टे अनुयायी असल्यामुळें ते वारंवार यज्ञही करीत असत. अर्थात् या यज्ञासाटीं त्यांनीं उत्तरेकडून यज्ञार्थ ब्राह्मण आणले असणें असंभवनीय नाहीं; अशी गोमंतकांतील सारस्वतागमनाची दुसरी उपपत्ति आहे.

परशुरामाचा कोंकणांतील यज्ञ–मौजे हरमल तर्फ पेडणें या गांवीं झाला अशी दंतकथा आहे. त्या यज्ञाची खूण म्हणून एक भस्माचा डोंगर अद्यापिही तिथें दाखवितात. पण तो यज्ञ वास्तविक कदंब राजांनीं केला होता व माहितीचे अभावीं परशुरामाशीं तो निगडित केला गेला असेंही कित्येक इतिहाससंशोधकांचें मत आहे. गोमंतकाचे एक आस्थेवाईक अभ्यासक श्री. वासुदेव वामन वाघ यांनीं हें मत पुढें मांडलें आहे. कदंब राजांत 'परशुराम' या नांवाचा कोणी राजा होऊन गेला होता असें सिद्ध झालें तर या म्हणण्याला बळकटी मिळेल असें येथें सुचवावेंसें वाटतें.

परशुरामानें निमंत्रून आणलेले दशगोत्री अथवा दशकुल ब्राम्हण पुढीलप्रमाणें होतेः—

भारद्वाजः कौशिकश्च वत्स–कौंडिन्य–कश्यपाः ।
वसिष्ठो जमदग्निश्च विश्वामित्रश्च गौतमः ॥ १ ॥
अत्रिश्च दश ऋषयः स्थापितास्तत्र एवहि ।
श्राद्धार्थं चैव यज्ञार्थं भोजनार्थंच कारणात्

(—सह्याद्रिखंड)

[यांचीं एकंदर ६६ कुळें असून त्यांत कौशिक, वत्स व कौंडिन्य यांचीं प्रत्येकीं १० होतीं असेंही वरील पुराणांतच सांगितलें आहे. 'सासष्टी' हें गोमंतकांतील एका विभागाचें नांव या ' सहासष्ट ' कुळांच्या वसाहतीवरूनच पडलें असावें असें अनुमान आहे.

धर्मच्छळाच्या काळचीं परिस्थिति :—

या काळांत एकाद्या हिंदु कुटुंबांत तीन चार भाऊ असले तर एकानें ख्रिस्ती व्हावें व बाकीच्यांनीं लपून छपून दिवस काढावे असाही प्रकार घडे. एक दोन पिढ्यांपर्यंत त्यांची एकमेकांना जाणीव होती व परस्परप्रेमानें ते रहात होते. पण पुढें हें नातें विसरलें गेलें व एकमेकांचे संबंध तुटले. तथापि अशा प्रकारें ख्रिस्ती धर्मांत हीं कुटुम्बें गेलेलीं असलीं तरी त्यांच्यांत जातिबंधनें पूर्वीप्रमाणेंच बहुतेक आजही आहेत. चारडे (क्षत्रिय)-कुंभार-खारवी–सुदीर (शूद्र) इत्यादि जाति त्यांच्यांत आहेत.

यांच्यापैकीं कित्येक कुटुम्बांतून हिंदु देवतांना नवस-सायास करण्याची व कौल मागण्याची पद्धति अद्यापिही आहे.

हे सारे ख्रिस्ती लोक रोमन कॅथॉलिक पंथाचे असून या पंथांत ख्रिस्त, मेरी इत्यादींचे पुतळे व चित्रें यांची विशिष्ट पद्धतीनें पूजा करण्याची पद्धति असल्यामुळें इकडील ' चर्चा' मधून हे पुतळे व चित्रें बरींच दिसून येतात.

या काळांतील सारस्वतांचीं कांहीं कुटुंबें चांगलीं संपन्नही होतीं. कोची येथें जाऊन राहिलेला ' कामत ' या नांवाचा एक ब्राह्मण होता; तो कोचीपासून दोन कोसांवर ' अंडिक्लडव ' म्हणून एक गांव आहे तिथें स्थायिक होऊन राहिला. त्यानें बरोबर फक्त मोहराच घेतल्या होत्या त्या वाहून नेण्याला २०० मजूर लागले होते !

५ श्री शिवपार्वतींचें गोमंतकांत आगमन

प्राकृत 'मांगीश माहात्म्यांत' या स्थानाचें वर्णन आलें आहे तें असें–

" परम विश्रांतीचें भुवन । अयोध्या–मथुरा माया-स्थान ।
काशी-कांची-अवन्ती पावन । कां द्वारकेसमान पुण्यभूमि ॥ १ ॥

जें स्थळ पाहतां समुद्राप्रती । पाहिली दिसे द्वारावती ।
हालों विसरलीं नेत्रपातीं । अतिरमणीय द्रुमवनें ॥ २ ॥

....

पूगवृक्ष नारळीवृक्ष । दाडिंब पनस आम्रवृक्ष ।
तांबूलवल्लीदळें विशेष । अति रमणीय शोभती ॥ ३ ॥
नाना पुष्पवल्ली गुल्म । जाई जुई मल्लिका परम ।
चंपक स्वर्ण केतकी कुसुम । सर्वकाळ घमघमित ॥ ४॥
अशोकवृक्ष तांबोणवृक्ष । रक्तपुष्पीं शोभती बहुवस ।
जंबु जांबूल चूत फणस । सदाफळीं घमघमती ॥ ५ ॥
कूपोदक पाटोदक । सरोवरीं विश्रांतिदायक ।
कर्दळीवनीं झुळरोदक । चौकडा झळझळां वाहती ॥ ६ ॥ ”

मांगीशाराधना

“ मांगीश ’ नामकं देवं यस्तूच्चरति मानवः ।
गन्धैर्धूपैश्च नैवेद्यैर्वस्त्रैश्च विविधैस्तथा ॥ १ ॥
कोमलैर्बिल्वपत्रैश्च पुष्पैर्नानाविधैरपि ।
शुद्धाक्षतैश्चाभिषिक्तैर्विविधैःस्तवनैरपि ॥ २ ॥
साष्टांगैश्च नमस्कारैस्तथा प्रार्थनया मुने ।
एवं संपूजितो भक्त्या भगवान् शंकरस्तदा ॥ ३ ॥
तुष्टो महेश्वरस्तस्य पुत्रपौत्रान् प्रदास्यति ।
अंते तस्य पदं स्मृत्वा सगच्छेच्छाश्वतं पदं ॥ ४ ॥
(—मां. म.)

श्रीशंकरांचें व्याघ्ररूप

श्रीशंकरांनीं व्याघ्ररूप धारण केल्याची आणखीही एक कथा महाभारतांत आहे.

पांडवांनीं राजसूय यज्ञ आरंभल्यावर यज्ञीय अश्व संचारासाठीं बाहेर पडला तो एकदा एका वनांतील विवरापाशीं आला. इतक्यांत त्या विवरांतून एक वाघ बाहेर येऊन घोड्याच्या पाठीवर बसला.

अश्वाच्या संरक्षणासाठीं त्याच्या मागून चाललेलें सैन्य आश्चर्यचकित झालें. बरोबर अर्जुन होताच. पण त्यानें पुढें काय मजा होते हें पाहण्यासाठीं कोणाला प्रतिकार करूं दिला नाहीं.

वाघाला पाठीवर घेऊन घोडा धावतां धावतां पुढच्या एका अरण्यांत एक शिवालय होतें तिथें जाऊन उभा राहिला, तेव्हां अर्जुनाला कळलें कीं हा व्याघ्र दुसरा कोणी नसून शिवच होय. म्हणून रथांतून खालीं उतरून त्यानें अष्टोत्तरशत शिवमंत्राचा जप केला. ध्यान संपवून अर्जुन पाहतो तों व्याघ्र तिथें नाहीं. नंतर त्यानें देवालयांत जाऊन शंकराची पूजा केली आणि आपलें नांव त्या देवालयाच्या भिंतीवर लिहून ठेवलें.

८ त्रयाणां शर्मणाम्

कुशावती आणि कुशस्थळी : कुशस्थळीपासून सुमारें ८।१० मैलांवर ‘ कुशावती ’ हा अघाशी नदीचा फांटा असून ‘ अघाशी ’ हीच आजची ‘ जुवारी ’ नदी होय. तिचेंच जुनें नांव असलेला आगशी हा गांव जुंवारीच्या उत्तर तीरावर आहे, व त्याचे पैल तीरीं ‘ कुशस्थळी ’ (आजचा ‘कुट्ठाळ’) गांव आहे. श्रीशंकरांनीं ‘ कुश ’ नामक दैत्याचा इथें वध केला होता अशी कथा आहे... ज्या ठिकाणीं कुशावती सागरास मिळाली तिथें ‘ शंखावली ’ गांव आहे. याचेंच आजचें नांव ‘ सांखवाळ ’ असें आहे.

देवदत्त व देवशर्मा

पुराणकारांनीं व त्यानंतरच्या कथेकऱ्यांनीं ‘देवदत्त’ व ‘देवशर्मा’ या नांवाचा घोंटाळा केलेला आहे. तथापि श्री. वाघ या इतिहास संशोधकांच्या मतें ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले असतां आद्य देवशर्म्याच्या मागून त्याच नांवाचा जान्हवीतीरनिवासी दुसरा देवशर्मा कदंबांच्या कारकीर्दीत इकडे आला होता; तो काश्यप गोत्री होता आणि त्याला कदंब राजानें सध्याच्या डिचोली तालुक्यांतील ‘ इंदुलाख्य ग्राम’ (आजचें ‘हिंदळें’ गांव) रहाण्यासाठीं

दिला असा उल्लेख सांपडतो. त्याची समाधिही तिथें आहे. त्याचे वंशज म्हणजे गोव्यांतील विश्वासराव देसाई, सूर्यराव सरदेसाई, आमोणकर, कुळकर्णी व नेरूरकर या नांवाचीं घराणीं आजही त्याला भजतात.

कपिला गायींची पौराणिक कथा

देवदत्त या नांवाचा एक ब्राह्मण समुद्र तीरावरच्या त्या गांवीं राहत होता. तो ' वेदवेदांगपारद ' असून ' जितेंद्रिय, ' ' जितक्रोध, ' ' सत्यवाक् ' व ' मंत्रविद् ' होता. एके दिवशी तो नजीकच्या वनांत " फल-पुष्प-कुश " इत्यादि पूजासाहित्य आणण्यासाठीं गेला असतां त्याला एक कपिला गाय चिखलांत रुतून पडलेली आढळली. त्याला एकट्याला कांहीं ती वर काढतां येण्यासारखी नव्हती. तेव्हां त्यानें जवळपास तपास केला तों त्याला एक गुराखी आढळला. त्याच्या साह्यानें त्यानें त्या गाईला ' पंकमुक्त ' करून घरीं आणलें, आणि तिचें यथोचित पालन केलें. त्या गुराख्याला त्यानें आपल्या घरींच ठेवून घेतलें. दररोज सकाळीं घरचा हा गुराखी तिला रानांत घेऊन जाई आणि संध्याकाळपर्यंत त्या रानांत यथेच्छ चरून संध्याकाळीं ती घरी येई.

एकदां त्या गुराख्याला दुपारच्या वेळीं तहान लागली म्हणून तो इकडे तिकडे पाण्याचा शोध करूं लागला. शोध करतां करतां त्याला एक जलाशय सांपडला. पाणी पिण्यासाठीं तो आंत उतरला तों तिथें त्याला काय दिसलें !

उदकांत एक रत्नमय लिंग असून त्याच्या मागें ' पंचवक्त्र ', 'दशभुज' ' श्वेतांग ', ' चंद्रशेखर ', ' नीलकंठ ', ' सर्पभूष ' असे श्रीशंकर सर्वांगाला भस्म फांसून उभे आहेत !

गुराख्यानें तत्काल त्या विभूतीला साष्टांग नमस्कार घातला आणि त्याची करुणा भाकली. श्रीविश्वेश्वर प्रसन्न होऊन त्याला म्हणालेः– " तुझ्या मनांत काय आहे सांग. " गुराखी म्हणालाः– " परमेश्वरा, तूं प्रसन्नच झाला आहेस तर माझें तुझ्यापाशीं एकच मागणें कीं, माझ्या हातून तुझें सदैव भजनपूजन व्हावें आणि तुझ्यापदीं नित्यवास असावा असें कर. "

श्रीशंकरांनीं त्याचें म्हणणें मान्य केलें; त्या कूपांतून बाहेर पडून ते गुराख्याबरोबर समुद्र संनिध गेले आणि तिथेंच अंतर्धान पावले !

कपिला गाईनें हा सर्व प्रकार दुरून पाहिला होता. म्हणून ती नित्य त्या जलाशयांत जाऊन आपल्या दुधाचा त्या शिवलिंगावर अभिषेक करीत असे.

या गुराख्याचें नांव ' मुलैत ' असें असून श्रीमंगेशाच्या परिवार-देवतांत 'मूलकेश्वर' (मूलक + ईश्वर) आहे तो हाच.

श्रीमंगेशाच्या महाजन-कुळांत प्रतिवर्षी कांहीं ठराविक दिवशीं ' मुळा ' आणि ' मातोळी ' (मुळा-मातोळी) ह्या नांवानें गावडा जातीच्या दांपत्याला नारळ, तेल, फुलें इत्यादि वस्तु अर्पण करून सर्वांआधीं भोजन देण्याचा कुलाचार आहे, त्याचा या कथेशींच संबंध असावा.

भारतांतील स्वयंभू शिवस्थानें

स्वयंभू शिवस्थानासंबंधांचे अनेक चमत्कार अन्यत्रही पहावयास मिळतात. उदा० उत्तर हिंदुस्तानांत एका ठिकाणीं रानांत एक गाय नित्य एका शिलाखंडाजवळ येऊन उभी राही आणि त्या शिलेवर एक नाग वेटोळें करून बसलेला असे, तो उंचावून गाईच्या आंचळांतून दूध पिई ! हा चमत्कार भैरवनाथ नांवाच्या एका राजानें पाहिल्यावर त्याला तो शिलाखंड म्हणजे शंकराचें स्वयंभू स्थान आहे असा स्वप्नांत साक्षात्कार झाला आणि त्यानें त्या ठिकाणीं ' भुजंगेश्वर ' नांवाचें मंदिर बांधलें आणि सभोवतीं गांव वसविला अशी कथा आहे.

पौराणिक कथांतील इतिहास

पौराणिक कथांत या तिन्ही ब्राह्मणांच्या गोत्रनामांत व लौकिक नामांत बराच घोंटाळा असलेला दिसतो. तथापि **देवशर्मा वत्सगोत्री, शिवशर्मा कौंडिन्य गोत्री** आणि **लोकशर्मा कौशिक गोत्री** होता ही गोष्ट आतां सिद्ध गोष्ट मानली जाते. वत्स व कौंडिन्य गोत्री सारस्वत श्रीमांगीशाचे आणि कौशिक गोत्री सारस्वत श्रीशांतादुर्गेचे उपासक आहेत. आणि देवशर्मा, शिवशर्मा यांचीं स्थानें मंगेशी येथें आणि लोमशर्म्याचें स्थान कवळें येथें आहे, यावरून हेंच सिद्ध होतें. परशुरामाच्या यज्ञसंबंधी कथेप्रमाणें गोमंतकांतील सारस्वत बंगाल प्रांतांतील 'त्रिहोत्रपुर' येथून आले असतील तर बंगाल्यांत

कालीमाता ही राष्ट्रीय देवताच असल्यामुळें त्यांनीं कोंकणांत येतांना आपल्या बरोबर या देवतेलाही इकडे आणणें असंभवनीय नाहीं. इकडे तिचें नामांतर झालें एवढेंच. शिवाय हे तीन्ही ब्राह्मण शिवोपासक होते आणि पार्वती ही शिवपत्नीच असल्यामुळें तिचीही भक्ति ते करीत असत असें म्हणण्याला हरकत नाहीं. आजही या तीन्ही गोत्रांचें वंशज किंवा सांप्रदायिक सारस्वत श्रीमंगेश किंवा शांतादुर्गा या दोहोंपैकीं कोणालाही कुलस्वामी किंवा कुलदैवत मानीत असले व त्यांचा त्या त्या देवस्थानांशीं विशेष ओढा असला तरी दुसरें देवस्थान हेंही तदनुषंगिक आहे असेंच मानतात आणि त्या देवस्थानीं गेल्याशिवाय आपलें देवकृत्य पुरें होत नाहीं असें समजतात.

९ *आपत्काल आणि स्थलांतर*

देवस्थानांना मिळालेलीं इनामें : हीं साताऱ्च्या छत्रपति श्री. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब मुख्य प्रधान असतां त्या दरबारांतील प्रसिद्ध मुत्सद्दी रामचंद्र मल्हार यांच्या विनंतीवरून मिळालेलीं आहेत.

"राजश्री रामचंद्र मल्हार यांचे कुलदेवांचीं देवालयें अंत्रुज प्रांतीं आहेत, तेथील ऊर्जेस तेल, फुलें आणि द्रव्यें पाहिजेत. त्यास खर्चाबद्दल रफायतपन्हां सदाशिव नाईक इमडी राजे सौंदे यांजकडून कवळें ग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसादेवीस एक वाडा व श्रीमंगेश देवास एक वाडा व नगदी महाल मजकुरीं अडीचशें रुपये इनाम संपादून घेऊन सनदी हांस केल्या आहेत."

--(तत्कालीन एक पत्र)

श्रीनानासाहेब पेशव्यांनीं सन १७५४ च्या सुमारास तत्कालीन गोव्याच्या गव्हर्नराला एक पत्र पाठवून श्रीमंगेश देवस्थानच्या इनाम जमिनीला गांवकऱ्यांतर्फे उपद्रव होतो तो होऊं नये म्हणून बंदोबस्त करण्याविषयीं कळविलें होतें.

पोर्तुगीजांचा जुलूम

त्यावेळच्या जुलमाची कहाणी सांगण्याचें हें स्थळ नव्हे. तथापि नमुन्यासाठीं तत्कालीन छळाचें एक उदाहरण इथें दिलें आहेः—

जे लोक ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचें नाकारीत किंवा नाकारल्याचा ज्यांच्याबद्दल संशयही येई त्यांना—मग ते तरुण--वृद्ध,स्त्री--पुरुष, गरीब-श्रीमंत, कसेही असोत त्यांना 'सांताकाझ' म्हणजे 'पवित्र गृह' या नांवाच्या एका भुयारांत कोंडून ठेवीत. आणि त्यांच्या अंगावर खरखरीत तागाचें कापड करकचून रपेटून त्यांचे हात मागील बाजूस घट्ट बांधीत. नंतर त्यांना उंच टांगून पायांना अत्यंत जड असें वजन अडकवीत व त्यांस जोराचा हिसका देऊन खालीं पाडीत !

असे कांहीं दिवस गेल्यावर या कैद्यांना आपला निर्णय ठरविण्यासाठीं एक दिवस नेमीत आणि त्या दिवशीं त्यांना बाहेर काढून त्यांपैकीं जे ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचें कबूल करीत त्यांना बाजूस काढीत आणि इतरांना ख्रिस्ती पाद्र्यांच्या स्वाधीन करीत. हे पाद्री मग त्यांना चाबकानें बडविणें, तापलेल्या लाल सांडसानें अंग भाजून काढणें, मुष्टिप्रहारानें रक्त ओकावयास लावणें, दगडावर आपटणें इत्यादि शिक्षा देत आणि त्यांतून कोणी जिवंत राहिलाच तर त्याला अग्नीच्या स्वाधीन करीत !

कुशस्थळींच्या देवता

जुन्या काळीं कुशस्थळी ऊर्फ कुट्ठाळ (Cortalim) गांवीं ज्या देवता होत्या त्यांचीं नांवें एका कागदांत पुढीलप्रमाणें आढळतात.

मंगनाथ (Manganath) श्रीमंगेश

सांतेरी (Santeri) सांतेरी

खेमसुभू (Quemsooboo) क्षेत्रपाळ

वीर (Vir) वीरभद्र

कपिलासोर (Capilasor) हा देव सध्या मंगेशी येथें नाहीं. फोंडें व कवळें यांच्यामध्यें कपिलेश्वरीस आहे.

नारायण(Narainna) लक्ष्मीनारायण

बागोंती (Bagonti) भगवती

गोपीनाथ (Gopinath) हाच सध्यांचा मूळकेश्वर असावा. कारण हें जुन्या गुराख्याचें प्रतीक आहे असें मानलें जातें आणि गोप–गुराखी ही व्युत्पत्ति याशीं जुळती आहे.

चंद्रिनाथ (Chandirnath) चंद्रनाथ हें याचें मूळ नांव आहे हें उघड आहे. आज हा देव चंद्रनाथ पर्वतावर याच नांवानें प्रसिद्ध आहे. (खुद्द 'मंगेशी' हा शब्दही पोर्तुगीजमध्यें Manguexim असा लिहिला जातो!

१० श्री स्थळवर्णन

ख्रिस्ती गावडे : जुन्या स्थळांच्या आसपास गावडे लोकांची वस्ती आहे. ते आज ख्रिस्ती आहेत. पण तेही श्रीदेवीचा उल्लेख करतांना 'माय' (माता) असाच करतात, आणि कोणी श्रीच भक्त (महाजन) आपलें पूर्व-स्थान पहावयास गेल्यास त्याचा मोठा सन्मान राखून त्याला तिकडची माहिती देतात.

११ मुख्य व परिवार देवता

मूळकेश्वर या देवतेची माहिती पूर्वीच्या सामाजिक एकतेवर प्रकाश टाकणारी असल्यामुळें पुढें दिली आहे :-

'श्री 'च्या मूळ कुशस्थळी या गांवीं देवशर्म्याच्या घरीं एक 'गावडा' गुराखी होता. त्याचें नांव 'मुळिक' असें होतें. हा गावडाहि देवशर्म्या-प्रमाणेंच श्रीमांगीशाचा एकनिष्ठ भक्त होता. आणि त्याचें व त्याच्या घराण्याचें वरील ब्राह्मणाच्या घराण्याशीं इतकें एकरूपत्व झालें होतें कीं, पोर्तुगीजांच्या जुलमाच्या वेळीं त्या ब्राह्मणाच्या घराण्यांतील वंशजांनीं आपलें उपास्य दैवत घेऊन तिथून पळ काढला तेव्हां या गावड्याच्या घराण्यांतील तत्कालीन पुरुषहि त्यांच्या बरोबरच अंत्रुज प्रांतीं आला. अर्थात त्याचें या स्थलांतराच्या वेळीं कुशस्थळीकरांना महत्त्वाचें सहाय्य झालें असलें पाहिजे.

श्रीमंगेशाची स्थापना इकडे झाल्यावर देवशर्म्याला जसें श्रींच्यासमोर

चौकावर स्थान मिळालें त्याचप्रमाणें गावडे घराण्याच्या या मूळ पुरुषाचें स्मारक म्हणून त्याचीही श्रीमंगेशाच्या मागच्या बाजूला 'मूलकेश्वर' या नांवानें स्थापना करण्यांत आली.

कदाचित असेंही असण्याचा संभव आहे कीं, 'कुशस्थळी' गांवीं ज्या वेळीं श्रीमंगेशाचें मूळ मंदिर उभारण्यांत आलें त्याच वेळीं ज्या गावड्याच्या मदतीनें श्रीमंगेश लिंगाची देवशर्म्याला प्राप्ति झाली त्या गावड्याचें स्मारकहि तिथेंच झालेलें असावें.

अलीकडील संशोधनांत कुशस्थळी उर्फ कुट्ठाळ गांवांतील देवतांचीं नांवें उपलब्ध झालीं आहेत, त्यांत '**श्रीमंगनाथ**' आणि '**गोपिनाथ**' अशीं नांवें आहेत. त्यांपैकीं 'श्री मंगनाथ' हाच जर 'श्रीमंगेश' असेल तर 'गोपनाथ' हाही गावडे मंडळीचा पूर्वज असूं शकेल.

पण तें कसेंही असलें तरी अंत्रुज प्रांतांत श्रीमंगेशाची पुनः स्थापना होतांना परिवार देवतांत गावडे लोकांच्या पूर्वजाला स्थान देण्यांत आलें आणि अशा रीतीनें या ब्राह्मण-शूद्र घराण्यांचा संबंध पुढल्या पिढीलाही सतत समजावा अशी योजना करण्यांत आली असावी.

आजही कोणी गावडा श्रीकडे कौल मागण्यास आला असतां त्याला अग्रमान देण्याची वहिवाट आहे. कारण तसें न केलें तर देव कौल देत नाहीं असें अनेक वेळां घडल्याचें सांगतात.

१२ पालवीं देवता

देवांचे तीन प्रकार–दैवत शास्त्रांत आणि व्यवहारांतही देवांचे मुख्य तीन प्रकार मानलेले आहेत.

(१) **कुलदेव**–कुलाचें संरक्षण करणाऱ्या म्हणून मानलेल्या देवता. यांची योग्य पद्धतीनें उपासना न केल्यास कुळास अपाय होतो. कुलसंरक्षण हेंच यांचें मुख्य कार्य होय. हीं दैवतें नवसास पावणारीं असतात.

(२) **ग्रामदेव**–हे ग्रामरक्षक देव होत. यांच्या कृपेनें ग्रामावरचीं परचक्रें किंवा रोगांच्या सांथी वगैरेसारख्या आपत्ति दूर होतात.

(३) **उपास्य दैवत**–उपासनेकरतां मुद्दाम स्वीकारलेलें दैवत तें उपास्य दैवत होय. हें सर्वांचें एकच नसून प्रत्येक व्यक्तीचें वेगळें असूं शकतें. प्रत्येक

जण आपल्या पसंतीप्रमाणें उपासनेकरतां दैवत निवडतो आणि त्या देवतेची उपासना करून समाधान आणि अध्यात्मिक आधिकार वाढवूं शकतो. उपास्य देवतेची उपासना न झाल्यास अपाय होण्याचा संभव कमी असतो.

१४ महाजन

मूळ नांवाची अनिश्चितता–चंदावरकर, नाळगूळ, कायसुवकर, कोळसकर, बिडीकर, चक्रमनी, तलगरे, सलगर, कारकोळ, पुणेकर, गोकर्ण, कल्याणपुरकर, कबाडकर, इसलुलकर, गळवडी इत्यादि उपनांवांचेहि महाजन आहेत. पण त्यांचें मूळ वांगड–उपनांव कोणतें हें निश्चित नाहीं.

त्याचप्रमाणें कानविंदे, सवनी (सोहनी), मुंग्रे, वर्टी, डांगी, दणाईत, पाटगांवकर, नाईक, पेडवे, कर्णिक, टेंभे, पंडित, चुंबडे, कोठारी, कलणकर, घाटे, दस्तीकर, बाडी, तुडवी, हेरेकर, चिंचखडकर, सांगडकर, हेमाडी, शिरूर इ. आणखी कित्येक उपनांवांची कुटुंबें श्रीची भजक आहेत. पण त्यांचें मूळ उपनांव कोणतें हें निश्चित नाहीं.

वर्द्यांचे वैशिष्ट्य :–वर्दे आणि त्याबरोबरच वालावलीकर, बोरकर, ज्याकी, भरणे, चंदवणकर, सबनीस या उपनांवांचेंहि (कारण हीं ' वरद्यां 'च्याच कारणपरत्वें व स्थानपरत्वें झालेल्या भिन्न शाखोपशाखांचीं नांवें आहेत.) हे श्रीमंगेश व शांतादुर्गा या दोहोंसहि कुलदैवत मानणारे आहेत. हे मूळचे वत्सगोत्री असून मंगेशाचेच महाजन होते. पण पुढें त्यांच्यांतील कोणा पुरुषानें श्रीशांतादुर्गेची उपासना घेतली व त्यास त्या देवतेपासून ' वर ' मिळाला, म्हणून ते दोहोंचेहि भजक झाले. ' वरदे ' हें उपनांव या ' वरा ' नंतरच प्रचारांत आलें असें सांगतात.

दुसरी एक आख्यायिका अशी आहे कीं, पूर्वी एकदां ' कुडथळी ' करांनीं म्हणजे वत्स व कौंडिन्यगोत्रीयांनीं ' केळोशीकरां 'वर म्हणजे कौशिकगोत्रीयांवर बहिष्कार घातला होता. त्यांत कौशिकगोत्रीयांतील एक कन्या विवाहापूर्वी उपवर झाल्यानें तिच्या आईबापांवर त्यावेळच्या समजुतीप्रमाणें मोठा अब्रूचा प्रसंग ओढवला होता. तो एका वत्सगोत्रीयानें स्वसमाजाच्या रोषाला न जुमानतां त्या कन्येचें पाणिग्रहण करून दूर केला; आणि उलट पक्षीं तत्कालीन कौशिकगोत्रीयांनीं या वत्सगोत्रीयास स्वसमा-

जांत घेऊन त्याला आपल्या बरोबरीनें श्रीशांतादुर्गेची महाजनकी दिली. ' कोंकणाख्यानांत ' या संबंधाचा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे:-

एका महाजनाचा पुत्र। लोटली ग्रामीं-त्याचें वत्सगोत्र। आपणापाशीं आणोनी सत्वर। प्रसन्न होवोनि वर दीधला ॥ १ ॥ देवतेचे आज्ञेप्रमाण। म्हणोनि केलें देवदर्शन। देवाची दया संपादोन। कन्यादान पैं केलें ॥ २ ॥ देवतेचें झालें वरदान। वृत्ति भाट दिधलें सासन। आणि वृत्ति ग्रामीं जोडून। केळोशी स्थानीं राहिला ॥ ३ ॥

पूर्वकालीन धार्मिक व सामाजिक संबंधांचे हें एक लक्षणीय उदाहरण आहे.

श्रीमंगेश संस्थाचें प्रस्तुत (सन १९६४) व्यवस्थापक मंडळ :—

श्री. केशव शेणवी मुळगांवकर (प्रेसिडेंट)
,, जिवोत्तम शेणवी कंटक (ट्रेझरर)
,, पुरुषोत्तम दत्ताराम शेणवी गुडे (मुखत्यार ॲटर्नी)
,, बाबी हरी शेणवी लाड (सेक्रेटरी)

श्रीशांतादुर्गा संस्थानचें प्रस्तुत व्यवस्थापक मंडळ :—

(१) श्री. नागेश शांबा शेणवी पिसुर्लेकर (प्रेसिडेंट)
(२) ,, शंभू गोविंद शेणवी कुवेलकर (ट्रेझरर)
(३) ,, सूर्याजी बाळकृष्ण शेणवी मळकर्णेकर (सेक्रेटरी)
(४) ,, नारायण रघुनाथ शेणवी साखरदांडे (मुखत्यार ॲटर्नी)

१५ देवकृत्यें

सोमसूत्री प्रदक्षिणा—श्रीशंकराचें सोमसूत्र म्हणजे तीर्थकुंड न ओलांडतां करावयाची प्रदक्षिणा ती सो. प्र. होय. " प्रथम समोरच्या नंदीपासून देवाच्या उजवीकडून तीर्थकुंडापर्यंत जावयाचें आणि तेथून मागें वळून पुनः फिरून नंदीकडे येऊन देवाच्या डावीकडे तीर्थकुंडापर्यंत जावयाचें व तिथून मागें फिरून पुनः नंदीकडे यावयाचें " अशी ही करावयाची असते.

श्री शिवाराधनेचें फळ :—

श्री शिवलीलामृतांत सांगितलें आहे कीं:–
शिवावर **अभिषेक** केला असतां पापसंहार होतो.
पूजेनें साम्राज्य प्राप्त होतें.
गंधाक्षमालांनीं सौभाग्य वाढतें.
धूप जाळिल्यानें अंग सुवासिक होतें.
दीप लाविल्यानें वंशवृद्धि होते. आयुष्य व कांति हींही त्यामुळें वाढतात.
नैवेद्यानें संपत्ति मिळते.
तांबूलानें चारी पुरुषार्थ साधतात.
नमस्कारानें आरोग्य येतें.
ध्यानानें महाज्ञान प्राप्त होतें.
श्रवणानें आधिव्याधि नाश पावतात.
नृत्यानें जन्म–मरण–मुक्तता येते.

१६ झुलवे

नाईक स्वामी :–कारवार जिल्ह्यांतील अंत्रवल्ली गांवचे मंगेश शंकर नाईक करंडे देसाई या नांवाचे एक सारस्वत ब्राह्मण श्रीमंगेशाचे एकनिष्ठ उपासक होते. ते एकदां श्रीमंगेशाच्या दर्शनास सहकुटुंब येत असतां वाटेंत काणकोणच्या जंगलांत त्यांची व कुटुंबाची चुकामूक झाली. त्या अरण्यांत शोध करूनही कुटुंबाची गांठ पडेना, म्हणून ते कष्टी होऊन संध्याकाळच्या सुमारास 'श्रीमंगेशा, आतां तूंच त्राता आहेस!' असें म्हणून स्वतःच्या देहाचीही पर्वा न करतां सर्वभावानें त्याला शरण गेले.

अशा स्थितींत असतांनाच त्यांना एका अवधूतवेषधारी साधूचें दर्शन घडलें. तो त्यांना म्हणाला :—

"बाबारे, एवढ्याशा अरण्यांत वाट चुकून आपल्या मंडळीस मुकलास तर तूं इतका कष्टी होतोस. वास्तविक या भयंकर भवारण्यांत वाट चुकल्या-मुळें आज कैक जन्म तूं भटकतच फिरतो आहेस नाहीं का ! आणि कोण,

कोठून आलों, कोठें चाललों, याचा विचार तूं कधीं केला आहेस का ? मग या एवढ्याशा दुःखानें इतका कष्टी कां होतोस ? ''

त्या सत्पुरुषाच्या या भाषणानें उपरति होऊन नाईकांनीं त्या अवधूताचे पाय धरले. पुढें तो निघून गेल्यावर त्यांचें कुटुंब त्यांना सांपडलें. सर्व मंडळी मंगेशीस येऊन श्रींचे दर्शन घेती झाली. पण नाईक हे नंतर सर्व संगपरित्याग करून केवळ परमेश्वराचें भजन करीत तिथेंच राहिले णाणि शेतटीं त्यांनी तिथेंच समाधि घेतली. [वैशाख शु॥ १२]

त्यांच्या हयातींत त्यांचा खर्च देवस्थानांतून चालत असे. त्यांच्या समाधीची जागा देवस्थानच्या समोर वनभोजनाच्या अग्रशालेच्या मागें आहे. आणि त्यांच्या पादुका त्यांच्या वंशजांच्या घरीं आहेत. तिथें त्यांची पूजा त्यांचे वंशज करतात. आणि नंदादीपाचा वगैरे खर्च देवस्थानामार्फत होतो. त्यांच्या पुण्यतिथीचा खर्चही देवस्थानांतूनच होतो आणि तो देवकृत्यांत ' पादुका ' या सदराखालीं जो खर्च आकारण्यांत येतो त्यांतून होतो.

卐

भागवत धर्माचा पाया रचणारे

श्री ज्ञानेश्वर महाराज

यांच्या अपूर्व

श्री ज्ञानेश्वरी ग्रंथावरील

प्रख्यात प्रवचनकार

श्री. राम केशव रानडे

यांचीं प्रवचनें

श्री ज्ञानेश्वरी–प्रसाद

या नांवानें

तीन भागांत प्रसिद्ध होत आहेत

पहिला भाग जून १९६४ मध्यें प्रसिद्ध होईल

—साहित्य रसमाला प्रकाशन
२१९ ठाकुरद्वार, मुंबई २.

प्रकाशन संस्था प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहि

ला प्रकाशन संस्था प्रकाश ाल 'साहित्य-

ाहित्य-रस माला प्रकाशन : देवेन्द्र द

र्धा नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रकाशन संस्था प्रकाशक

हित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रकाश

मित वाचा साहित्य-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-रस मा

प्ताहिक नियमि त्य-रस स्पर्धा नियमित

त्य-स्वप्न' सा वाचा साहित्य-रस स्प

दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित वाचा साहित्य-रस

काशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक नियमित वा

शन संस्था प्रकाशक: देवेन्द्र दलाल 'साहित्य-स्वप्न' साप्ताहिक

प्रकाशन संस्था प्रकाशक 'साहित्य-

त्य-रस माला प्रकाशन सं देवेन्द्र द

नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रकाशन संस्था प्रकाश

-रस स्पर्धा नियमित सोडवा साहित्य-रस माला प्रकाशन सं

